किंमत रु. ३०/-

वर्ष १३ • अंक ३ • १६ जून २०१३

पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

राजंकित

शिक्षणमाध्यम चर्चेतील प्रतिसाद
– प्रकाश बुरटे

शब्दबिंब– मोजणाऱ्या तोलणाऱ्या शब्दांची गंमत

विशेष विभाग– **कमला निंबकर बालभवन शाळेविषयीचे लेख**

मुलांनी तयार केलेल्या प्रकल्प अहवालांची नेटकी मुखपृष्ठे

खेड्याचे बदलते जीवन

वृष्टीची विविध रूपे – पर्जन्य, हिम, गारा

पूर्वीचे जनजीवन

संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफीक्स, सी-१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे-४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे-४११००४, येथे प्रकाशित केले.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

मुखपृष्ठाविषयी

कमला निंबकर बालभवनच्या माजी विद्यार्थ्यांनी तयार केलेलं जलरंगातलं सुंदर चित्र आणि शाळेतले काही उपक्रम.

पा ल क नी ती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

संपादक
संजीवनी कुलकर्णी

संपादक मंडळ
- नीलिमा सहस्रबुध्दे
- वंदना कुलकर्णी
- प्रियंवदा बारभाई
- शुभदा जोशी

मुखपृष्ठ व आतील मांडणी
विनय धनोकर

विशेष आभार
प्रकाश अनभुले

वार्षिक वर्गणी	आजीव वर्गणी
रु.२००	रु.२५००

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट **'पालकनीती परिवार'** या नावाने काढावा.

संपर्क :
पालकनीती परिवार,
अमृता क्लिनिक,
संभाजी पूल कोपरा,
कर्वे रस्ता, पुणे – ४११००४.
✆ –०२०–२५४४१२३०,
२५६७३५९६
palakneeti@gmail.com
www.palakneeti.org

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष **१३ वे** अंक **३ रा**
१६ जून २०१३

लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.

संवादकीय

हा अंक हातात पडेल तेव्हा शाळा सुरू झाल्या असतील. या नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जोमदार उत्साहानं व्हावी यासाठी नवी ऊर्जा देणारा, नव्या कल्पना मांडणारा आणि 'असे सगळे शैक्षणिक प्रयोग, बदल शक्य आहेत' असा विश्वास देणारा हा खास अंक तुमच्या हाती देताना आनंद होतो आहे. आजच्या या झाकोळलेल्या वातावरणातही आशेची पणती तेवत ठेवणाऱ्या गोष्टी आपण आवर्जून बघायला हव्यात, इतरांना सांगायलाही हव्यात.

हा अंक फलटणच्या कमला निंबकर बालभवन या बालकेंद्री, नवोपक्रमी शाळेबद्दल आपल्याला आवर्जून सांगण्यासाठीच आकारलेला आहे. १९९२ साली पालकनीतीच्या दिवाळी अंकात क.निं.बा. या शाळेबद्दल विशेष विभाग होता. त्यानंतरही अनेकदा शाळेतल्या शिक्षकांनी लिहिलेले लेख पालकनीतीतून आपण वाचलेले आहेतच.

पंचवीस वर्षांपूर्वी मॅक्सीन बर्नसन नावाच्या मूळ अमेरिकेतल्या, पण आता तनामनानं भारतीय झालेल्या द्रष्ट्या बाईंनी सुरू केलेली ही मराठी माध्यमाची शाळा आहे. मॅक्सीनमावशी या मुळातल्या भाषावैज्ञानिक आहेत. लहानग्या मुलामुलींना शाळेत यावंसं वाटायला हवं, यासाठी त्यांनी ह्या शाळेची उभारणी केलेली आहे. संधीवंचित समाजाला सक्षम होण्यासाठी साहाय्य करत राहण्याचं मॅक्सीनमावशींचं आणि त्यांनी उभारलेल्या ह्या शाळेचंही ब्रीद आहे. त्यासाठी जिवापाड कष्ट करण्याची, त्यासाठी नवकल्पनांना निर्भयपणे भिडण्याची हिंमतही या शाळेजवळ आहे.

या शाळेतच आमची आणखी एका अगदी साध्यासुध्या पण विलक्षण शिक्षकाशी – दत्ता अहिवळेंशी गाठ पडली होती. आज शिक्षणहक्क कायद्याच्या निमित्तानं आपण सर्वांनी ज्ञानरचनावादाबद्दल वाचलं-ऐकलं आहे. पण ज्या काळी याविषयी काही म्हटलं जात नव्हतं त्या काळात, अहिवळे सर मुलांना अशा प्रकारे गणित शिकवत की बालकांच्या मनात गणितातल्या प्राथमिक संकल्पना अक्षरश: एखाद्या फुलाप्रमाणे उमलून येत. हे बघण्याचा आनंद, अहिवळे सरांचा इयत्ता पहिलीचा गणिताचा पाठ बघताना मी अनुभवलेला आहे. त्यानंतर १९९८ साली पालकनीती परिवारातर्फे तेव्हा देण्यात येत असलेला सामाजिक पालकत्व पुरस्कारही अहिवळे सरांना देण्यात आला होता.

एका जुन्या गोडाऊनच्या जागेत उभ्या असलेल्या या शाळेच्या कणाकणात प्रत्येक गोष्टीवर लक्षपूर्वक, मन लावून, सातत्यानं, सर्जकतेनं काम करण्याची इच्छा आणि समतेची निष्कपट जाणीव मॅक्सीनमावशींनी बहुदा भिनवून दिलेली असावी. गेली इतकी वर्षं या शाळेत मी अधूनमधून जाते आहे. प्रत्येकवेळी आपल्याला शिक्षणात आणखी नवीन कायकाय करता येऊ शकेल याचा प्रत्यय इथं येतच राहतो. अनेक घरातली, शिक्षणाची संधी मिळणारी पहिली पिढी ह्या शाळेत येते. अन्नपाण्याचे प्रश्न सोडवण्यातून सवड न मिळणारे काही पालक इथे आहेत. मूल शिकावं म्हणून त्याला शाळेच्या वेळेला धाडून देण्यापलीकडे काही करायचं असतं याचा अदमासही त्यांना आज नाही. पण, त्यांना आपल्या मुलांनी शिकावं ही दुर्दम्य इच्छा मात्र आहे, याची शाळेला जाणीव आहे. इतकंच नाही तर मुलं इथूनतिथून सारखीच असतात, चौकस असतात, बुद्धिमान असतात, शिकायला उत्सुक असल्यानं चांगलं शिकायला मिळालं की आनंदानं शिकतात, यावर शाळेचा अढळ विश्वास आहे.

निष्पत्तीवर आधारित गुणवत्तापूर्ण शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळालीच पाहिजे, हे आज शिक्षणहक्क कायद्याच्या नियमांनी बांधून दिल्यानं, अनेक शिक्षकांना काचणारं गृहितक ह्या शाळेनं स्वाभाविकपणे केव्हाच स्वीकारलेलं आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन असावं, पण आठवीपर्यंत नापास करणाऱ्या परीक्षा नसाव्यात; असं आज जे म्हटलं जातं, त्यावर 'हे कसं करायचं बुवा?' असा प्रश्न जर कुणा शिक्षकांना पडत असेल, तर त्यांनी कनिंबातल्या मुलामुलींनी केलेले प्रकल्प आणि त्यामागची त्यांच्या शिक्षकांची दृष्टी, कल्पकता आणि समर्पक प्रयत्न पहावेत. मात्र त्यावरून असामान्य असेच शिक्षक या शाळेत एकत्र झाले असावेत, असा निष्कर्ष आपण काढू नये. अनेक शिक्षकांकडे अशी कल्पकता, कार्यशीलता असतेच; पण त्या सगळ्याला या शाळेत जो वाव मिळतो, तो जास्त महत्त्वाचा आहे. एकाच पद्धतीनं सर्वांनी जावं असा हट्टाग्रह इथं अजिबात नाही. उलट नवतेचा शोध घ्यायला प्रोत्साहनच मिळतं. जिथे कुठे जे काही नवं, चांगलं दिसेल ते आणावं, आपल्या विद्यार्थ्यांच्या सोईला येईल असं जुळवावं, अशी तयारी डॉ. मंजिरी निमकरांसह सगळ्याच शिक्षकांची असल्याचं इथं दिसून येतं.

या अंकात नमुन्यादाखल दिलेलं लहान मुलांचं लेखनही आपल्याला खिळवून ठेवतं. केवळ लहान मुलाचं म्हणून कौतुकानंच नाही, तर मोकळा अवकाश मिळाल्यावर मुलं किती नितळ सच्चेपणानं लिहू शकतात, याचा अंदाज त्यातून येतो. मोकळ्याढाकळ्या शैलीत लिहिता लिहिताच मुलांच्या मनात विचारांची प्रक्रिया प्रगल्भ होत जाते, हेही यातून दिसतं ह्याकडे आपलं लक्ष वेधलं जातं. मुलांच्या भाषेवर, त्यांनी निवडलेल्या विषयांवर इथं मोठ्यांनी अजिबात हस्तक्षेप, ढवळाढवळ काहीही केलेली नाही. त्यामुळे मुलांना जसं जाणवतं तसं, नितांत साधेपणानं त्यांनी मांडलेलं आहे. हे विषय मुलांनी लिहिण्याचे आहेत की नाहीत, असा कुठलाही

नियम-निकष इथं लावलेला नाही. हे मला सगळ्या पालकशिक्षकांना अगदी सांगायचंच आहे.

ठरवलं तर शिक्षणाच्याच काय कुठल्याही क्षेत्रात चांगलं काही करता येतं, हे आपल्याला माहीत असतंच. पण ते समोर बघायला मिळालं, वाचायला मिळालं की आपल्यालाही काही सुचायला लागतं. मनांमध्ये काही नवं, आगळंवेगळं यायला लागतं. बदल घडू शकतात, घडतात यावर विश्वास बसू लागतो. कनिंबामध्ये तयार झालेल्या कल्पना ही त्या शाळेची असली तरी तशी शेवटी शिक्षणकार्याचीच मिळकत असते. तेव्हा त्याचा उपयोग इतर शाळांनीही करून घ्यावा, यात गैर काहीच नाही. इथल्या मुलामुलींना मिळणारा मोकळा अवकाश सर्वत्र मिळावा याहून अधिक आम्हाला तरी काय हवं असणार? कनिंबाचं म्हणाल तर त्यांची ही नुसती इच्छाच नाही तर अशा प्रयत्नांना साहाय्य करण्याचं अभिवचनही त्यांनी दिलेलं आहे.

आपल्याला जे मिळालं ते आयुष्यासाठी फार मोलाचं होतं याचा विश्वास, शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या पुढच्या पिढीला वाटतो; आणि आपल्या क्षमतांची भर घालायला ते त्याच शाळेत परत येतात, असं जेव्हा घडतं तेव्हा 'ती शाळा जिंकली', असं मला वाटतं. एखाद्या शाळेत होणाऱ्या नवप्रयत्नांची, शाळेनं विद्यार्थ्यांवर केलेल्या प्रेमाची ती खरी पावती असते. कमला निंबकर बालभवन या परीक्षेतही अत्यंत यशस्वी ठरलेली आहे. शाळेची जबाबदारी उचलायला या शाळेची नवी पिढी सज्ज होते आहे. शिक्षणाचं ब्रीद इथे मागच्या पिढीकडून सक्षम, तरुण हातांमध्ये, मनांमध्ये संक्रमित होतं आहे.

प्रतिसाद

शिक्षण-माध्यमाच्या आग्रहातील गुंतागुंत

प्रकाश बुरटे

आर्थिक विषमता, नाना प्रकारच्या सामाजिक उतरंडी, जातवास्तव, आणि पुढील पिढीच्या भवितव्याबाबत साशंकता या पायावर आजचे वास्तव उभे आहे. मुलांच्या भवितव्याशी पालकांचीही स्वप्ने जोडलेली असल्याने मुलांचे भवितव्य उज्ज्वल होण्यासाठी सजग पालकांची जमेल तशी धडपड चालू आहे. भवितव्याचा अर्थ 'अर्थाजनाची कुवत' एवढाच आहे. मुलां-मुलींच्या सर्वांगीण विकासाला या स्वप्नांत फारसे महत्त्व मिळत नाही. पालक पाल्याच्या शिक्षण माध्यमाबाबत आपापल्या मगदुराप्रमाणे निर्णय घेतात.

आपले शैक्षणिक वातावरण बऱ्याच अंशी पावलोव्हने रचलेल्या वर्तनवादी पायावर उभे आहे. परिणामी, शिकविण्याची पद्धती - लेक्चर देणे/झोडणे आणि शिकण्याची पद्धती - समजून किंवा न समजता ऐकलेले लक्षात ठेवणे आणि परीक्षेत बरोबर उत्तर उतरविणे ही आहे. या वातावरणात साहजिकच भाषा हे शिक्षणाचेच माध्यम मानण्याची चूक आपल्याकडून होते. परिसरभाषादेखील मुलाची पहिली भाषाच असल्याने यापुढील लिखाणात मातृभाषा या शब्दाच्याऐवजी परिसरभाषा हा शब्द वापरला आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ शिक्षणाचा ज्ञानरचनावादी दृष्टिकोन मानत असल्याने ज्ञानरचनावाद हा शब्द नुकताच कुठे क्षितिजावर उगवू लागला आहे. त्यातून शिकविण्यासाठी लेक्चर पद्धत वापरण्याची चूक टाळणे शक्य होईल अशी आशा करूया. ज्ञानरचनावादानुसार आकलन / बोधन होण्यासाठी उपक्रम महत्त्वाचे असतात. उपक्रमात, निष्कर्ष माहीत नसणारे प्रयोग, निसर्ग निरीक्षणे, प्रकल्प, विद्यार्थ्यांच्या गटचर्चा, शब्द-अभिनय-संगीत-गीत-चित्र-इ. माध्यमांतून होणारे सादरीकरण यांचा समावेश होतो. नव्या शिक्षणपद्धतीमध्ये उपक्रम हे शिक्षणाचे माध्यम बनवायचे आहे. परंतु उपक्रमांच्या जोडीने त्यावर चिंतन/विचार आणि संवाद आवश्यक असतो. चिंतन/विचार आणि संवादासाठी भाषा आवश्यक असते. त्यासाठी प्राथमिक आणि काही अंशी माध्यमिक शिक्षणाच्या काळात परिसरभाषा हे माध्यम असले पाहिजे.

मराठी परिसरभाषा असणाऱ्या पाल्यांसाठी शिक्षणाचे माध्यम मराठी असावे या वाक्यात मराठी ही एक भाषा असल्याचे आपण गृहीत धरतो. प्रत्यक्षात मराठी हा एक **भाषासमूह** आहे. प्रमाणमराठी ही त्या समूहांतील केवळ एक भाषा आहे. प्रमाणमराठीपासून या समूहातील इतर मराठी भाषा भिन्न भिन्न अंतरावर आहेत. अशा सामाजिक वातावरणात जगणारे पालक शिक्षणाच्या माध्यमाबाबत त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्तरांनुसार पुढील तीन ठळक प्रकारांनी विचार आणि कृती करताना दिसतात. त्यावर प्रमाणमराठीपेक्षा इंग्रजी भाषेला बाजारपेठेने सकारण जास्त महत्त्व दिले असण्याचाही दाट प्रभाव आहे.

यातील **पहिला गट** आहे **उच्च जातीय व उच्च आर्थिकस्तरीय पालकांचा**. त्यांची मराठी भाषा बरीचशी प्रमाणमराठीशी मिळती-जुळती आहे. हे पालक मुलांकडून वीस-पंचवीस वर्षे आर्थिक कमाईची अपेक्षा करत नाहीत. साहजिकच प्राथमिक शिक्षणाच्या काळात त्यांच्या मुलांची संवाद माध्यमभाषा प्रमाणमराठी असली तरी नंतर ते बऱ्यापैकी चांगले इंग्रजी आत्मसात करू शकतात. या उलट, मुलांसाठी सुरवातीपासून इंग्रजी माध्यम असले तर ही पालक मंडळी मुलांशी इंग्रजीतून बोलू शकतात आणि काही अंशी तरी नक्कीच इंग्रजी ही मुलांची परिसरभाषा बनवू शकतात. त्यामुळे त्यांच्या मुलांनी प्रमाणमराठी किंवा इंग्रजी भाषा संवादाचे माध्यम म्हणून स्वीकारली तरी त्यांचे सहसा

शालेय काळातील माझा भाषिक अनुभव

व्ह.फा. पास झालो. आठवीसाठी मला सोलापुरातील नॉर्थकोट टेक्निकल हायस्कूलमध्ये भरती केले. हायस्कूल टेक्निकल असल्याने आम्हाला इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, संस्कृत हे विषय नव्हते. प्रमाणमराठी ही वर्गातील बोलाचालीची माध्यमभाषा होती. भाषाविषय बाई शिकवायच्या. मराठीच्या बाई आम्ही संस्कृत न येणारी या अर्थाने अ-संस्कृत मुले, असा विनोद करायच्या. प्रमाणमराठीने सुसंस्कृत, असंस्कृत, संस्कृती, संस्कृतभाषा असे अनेक शब्द/ शब्दसमूह संस्कृतभाषेतून आयात केले आहेत. त्या सर्व जोडशब्दात लुडबुडणारा संस्कृत हा शब्द जिव्हारी लागायचा. बाई आमच्या कन्नड भाषेतून आलेल्या हेलांकडे दुर्लक्ष करत असल्या तरी त्या व्याकरणाच्या चुका काढायच्या. मी ९-१० इयत्तेत असताना याच बाईंच्या एका तासाला मजा झाली. निम्न जातीतील आणि कन्नड परिसरभाषा असणाऱ्या वर्गातील एका मुलाने बहुतेक 'मी अंघोळ केलो' अशा प्रकारचे वाक्य लिहिले असावे. बाईंनी त्यावर लाल फुली मारली असावी. त्यावरून वर्गात झडलेला संवाद असा:

आपला पेपर फडफडवत त्याने बाईंना विचारले : बाऽऽयी, ह्ये का चुक्लं?

बाई : अरे, मी अंघोळ केली, असे लिहायला पाहिजे. कारण अंघोळ हा शब्द स्त्रीलिंगी आहे.

तो : पण मी पुल्लिंगी प्वॉरगा हाये, तसं लिवलं तं प्वोरगी, रं प्वोरगी असं चिडीवत्यात.

बाई : अरे, पण हा कर्मणी प्रयोग आहे. वाक्याचे क्रियापद कर्माप्रमाणे बदलावे लागते.

तो : म्हराटीत काय समदे कर्मनीच परयोग असत्यात का काय? ह्यो का कर्मनी? मराठी भाषेत सगळी वाक्ये कर्मणी प्रयोगाची नसल्याने ह्यो का कर्मनी? या प्रश्नाचे उत्तर देणे अवघड होते.

'आपल्या मराठी भाषेची तशी पद्धत आहे.' असे म्हणून बाईंनी वेळ मारून नेली असावी.

मुकाट खाली बसत तो खालच्या आवाजात म्हणाला, आमच्या म्हराटीची येगळी हाये पद्दत. मागच्या बाकांवरून हलकासा हशा पिकला होता.

हशा पिकण्यापेक्षा मी अंघोळ केलो यामागील मुलांना पटण्याजोगे कारण न सांगता येणे आणि तरीही पेपरावर लाल गोळा उमटलेला असणे, अपमानास्पद होते. माझे पालक दुसऱ्या प्रकारातील असल्याने नंतर मला प्रमाणमराठी आणि इंग्रजी भाषाही बऱ्यापैकी जमून गेली.

काही बिघडत नाही.

दुसऱ्या गटातील पालक आर्थिक परिस्थिती आणि जातवास्तव या निकषांवर उच्चमध्यम स्तर बनण्याच्या उंबरठ्यावर आहेत. त्यांच्या मराठी भाषा प्रमाणमराठीपेक्षा थोड्याफार वेगळ्या आहे. परंतु प्रमाणभाषा ही संकल्पना समाजात आणि शिक्षणव्यवस्थेत रुजलेली असल्याने कमी-अधिक प्रमाणात समूहातील इतर मराठी भाषांचे उच्चार, हेल, शब्द, वाक्यरचना, व्याकरण थोडक्यात जे जे तिच्या अनुसार नाही ते ते सर्व अशुद्ध, चूक, ग्राम्य, गावंढळ, त्याज्य... मानले जाते. शुद्धलेखन या जोडशब्दातील शुद्ध याचा एक अर्थ पवित्र असाही आहे. या मुलांची मराठी भाषा अशुद्ध मराठी भाषा म्हणूनच हिणवली जाते. त्यांच्या भाषेचा आणि या मुलांच्या पाठ्यक्रमाबाहेरील ज्ञानाचा, शाळा नामक सरस्वतीच्या मंदिरात शिरकाव होणार नाही याची पक्की तजवीज केलेली असते. या वर्गाला स्वतःच्या मुलांसाठी इंग्रजी ही परिसरभाषा बनविणे अवघड जाते. या स्तरातील मुलांना इंग्रजीपेक्षा प्रमाणमराठी भाषा हे माध्यम अपमानास्पद आणि म्हणून दूरी निर्माण करणारे असले, तरी तुलनेने जवळचे आहे. अपवाद म्हणून संवेदनशील वृत्तीचे शिक्षक जर या विद्यार्थ्यांना भेटले तर थोड्याफार प्रयत्नाने प्रमाणमराठी भाषा या विद्यार्थ्यांना बऱ्यापैकी जमू शकते. या पालकांपैकी बरेच पालक आपल्या पाल्यांसाठी प्रमाणमराठीची निवड, अपमान गिळून उगाच करत नाहीत. या मुलांना प्राथमिक शिक्षण काळात इंग्रजी ही दुसरी भाषा म्हणून जरूर शिकविता येते. या गटातील काही पालकांची नजर बाजारपेठेकडे जास्त असते. ते पाल्यांसाठी इंग्रजी माध्यमाची निवड करतात. इंगजी नीट येत नाही, घरांतून इंग्रजीबाबत पुरेशी मदत मिळत नाही. परिणामी, या मुलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. शिकवण्या, क्लासेस यांचा कितीही मारा केला तरी या मुलांत अपयशाचे प्रमाण मोठे असते.

पालकांचा तिसरा ठळक गट आहे आदिवासी, भटके-विमुक्त, दलित आणि स्थलांतरित कष्टकऱ्यांचा. त्यांचे जगणे अवमानकारक आणि दुर्लक्षित असते. त्यांच्यासाठी प्रमाणमराठी आणि इंग्रजी कोसो दूर असते.

'ह्यो का कर्मनी' या प्रश्नाला खरे तर उत्तर नाही. पण ही संधी घेऊन बाईंना प्रमाणभाषा आणि बोलीभाषेतला फरक सांगता आला असता. बोलीभाषेवर परिसरात बोलल्या जाणाऱ्या इतर भाषांचा प्रभाव असतो, त्याबद्दल बोलता आले असते.

मराठी प्रमाणभाषेची धाटणी इथे लक्षात घ्यायला हवी. करणे, खाणे, वाचणे या क्रियापदांचा वर्तमानकाळात कर्तरी प्रयोग होतो. मी अंघोळ करतो/ करते; मी आंबा खातो/ खाते; मी कविता वाचतो/ वाचते असे म्हटले जाते. परंतु हीच क्रियापदे भूतकाळात वापरताना मी अंघोळ केली; मी आंबा खाल्ला; मी कविता वाचली असा कर्मणी प्रयोग केला जातो. बोलीभाषेत कन्नड प्रमाणे मी अंघोळ केलो असे म्हटले गेले तरी प्रमाणभाषेत तसे वापरले जात नाही.

– संपादक

परप्रांतातून आलेल्या कष्टकरी समाजाची अवस्थादेखील फारच बिकट आहे. या वर्गातील पाल्यांसाठी त्यांच्या परिसरभाषा हे शिक्षणसंवादाचे माध्यम असणे सर्वात जास्त गरजेचे आहे. परंतु त्यासाठी जबरदस्त राजकीय इच्छाशक्ती असावी लागते. तसे बदल घडवू पाहणारी सामाजिक शक्ती क्षितिजावर नाही. त्यामुळे प्रमाणमराठी किंवा इंग्रजी यापैकी कोणतीही भाषा संवादभाषा म्हणून निवडली तरी त्यांच्या कपाळावरील अपयशाचा शिक्का चुकत नाही. सध्याची शिक्षणव्यवस्था त्यांना ढ बनवून शिक्षणाबाहेर फेकते आहे. अडचणींवर मात करत काही मुले मात्र शिक्षणात अपवाद सिद्ध करण्याइतपत संख्येने टिकतात. या गटातील मुलांनी प्रमाणमराठीऐवजी बाजारपेठेत जास्त मूल्य असलेली इंग्रजीभाषा जरी माध्यम भाषा म्हणून निवडली तरी यशस्वी मुलांच्या अपवादात्मक संख्येत फरक पडणार नाही.

विलायतेत जातीव्यवस्था नसल्याने विलायती इंग्रजीभाषा जातीवाचक अवमानकारक काही बोलत नसली आणि दलितांना तेवढे पुरेसे असले तरी इंग्रजीला समतावादी म्हणून गौरविता येणार नाही. इंग्रजीभाषेतही सत्तेच्या पितृसत्ताकता, वंशवाद, धर्मांधता, उत्तर-दक्षिण असमान संबंध इत्यादिमधून व्यक्त होणाऱ्या अनेक उतरंडी आहेतच. इंग्रजीचा स्वीकार करताना आपण ह्या सत्तासंबंधांचे काय करणार, हा प्रश्न उरणार आहे.

भविष्यातील समाजाच्या कल्पनाचित्राचे महत्त्व

शिक्षणाच्या माध्यमाबाबत गांधीजींनी १८९७ ते १९३७ या चाळीस वर्षांत काही उपाय शोधण्याचा अनेक अंगांनी प्रयत्न केला. त्या आधारे नई तालीमचा विचार गांधीजींनी १९३७ मध्ये पुढील प्रकारे मूर्तरूपात मांडला: **१.** पहिली ते सातवी आणि जमलेच तर मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे. **२.** संवादाचे माध्यम मातृभाषा परिसरभाषा असावे. हाताने केलेल्या उत्पादक कामाच्या भोवती सात वर्षांच्या संपूर्ण काळातील मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची उभारणी करावी. शिक्षणातील सर्व प्रक्रिया आणि उपक्रम यांची आखणी मुलांचा परिसर, पालकांच्या आणि समाजाच्या गरजा, आणि शिक्षणाचे हेतू लक्षात घेऊन निवडलेल्या केंद्रीभूत उत्पादक कामाभोवती एकात्म पद्धतीने करावी. **शिक्षणाचे माध्यम कुठलीही भाषा नसून उत्पादक काम आहे आणि मातृभाषा हे संवादाचे माध्यम आहे** असे नई तालीम मानते. उत्पादक काम म्हणजे हाताने बनविलेल्या समाजोपयोगी वस्तू बनविण्याचे काम. गांधीजींच्या काळात या कामाचा संबंध अर्थातच बाजारपेठेशी होता आणि तो आज तर जास्तच घट्ट झाला आहे. परंतु संदर्भ नजरेआड केला तर उत्पादक कामाचा बाकी अर्थ चिनी म्हणीशी समांतर दिसतो. ती म्हण आहे: मी ऐकले, मी विसरलो; मी पाहिले, माझ्या लक्षात राहिले आणि मी केले, मला समजले.

नई तालीमची मूलभूत तत्त्वे ज्या काळात गांधींनी मांडली तेव्हा ती नक्कीच क्रांतिकारी होती. उदाहरणार्थ, शिक्षण म्हणजे विद्यार्थांच्या डोक्यात माहिती कोंबणे नाही, तर प्रत्येक मुलात सुप्तावस्थेत असणाऱ्या उत्तम माणूस बनण्याच्या शक्यता प्रत्यक्षात उतरविणे आहे. शिक्षण फक्त मेंदूशी - हुशारीशी - निगडित नाही, ते तेवढेच शरीर आणि मन/आत्मा यांच्याशी निगडित आहे. साक्षरता हे केवळ एक तंत्र आहे, ते ध्येयापर्यंत जाण्याचे एक साधन आहे. साक्षरता हे काही शिक्षणाचे अंतिम ध्येय नाही.

हाताने करायचे काम हे शिक्षणाचे माध्यम बनले पाहिजे ही गांधीजींची कल्पना. काम, त्यात कमावलेले कौशल्य हे साधन; त्या आधारे घडवायचे शिक्षण हे साध्य. गांधींसाठी साध्य-साधन विवेक गाभ्याचा होता. नई तालीमचे प्रारूप मांडताना त्यांच्या मनात उद्याच्या समाजाचे एक कल्पनाचित्र होते. त्याचा बाज ग्रामस्वराज्य या संकल्पनेत दिसतो. परंतु उद्याच्या समाजाची ग्रामस्वराज्य ही संकल्पना जनतेच्या आणि नेहरू-पटेल या नेत्यांच्याही पचनी पडली नाही आणि म्हणून ती मनापासून राबविली गेली नाही. त्यात जातीच्या उतरंडी जास्त भक्कम होण्याची भीती कदाचित जाणवत असावी. या संदर्भात डॉ. विनोद रैना यांचा Integrating Work and Education हा लेख आवर्जून वाचावा. तो पुढील वेबसाईटवरून डाउनलोड करून घेता येईल: http://www.ashanet.org/centralnj/conference/2007/docs/Integrating%20Work%20and%20Education.pdf

सध्या नई तालीम इतिहासकालीन दस्तावेज म्हणूनच उरली आहे.समाजवादी प्रभावामुळे असेल पण नेहरूंच्या मनातील उद्याच्या समाजाचे चित्र वेगळे होते. समाज त्या दिशेने चुकत-घडत गेला.

समाजाचे चित्र १९९१ पासून बदलण्याला पुन्हा सुरुवात झाली आहे. या बदलाचा पाया खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण हा आहे. या बदलापायी निम्न स्तरावर अन्याय होत असूनही तो स्तर बदलाची तीच स्वप्ने पाहत आहे. मध्यम-उच्चमध्यम वर्गाने ती बदलाची संकल्पना भविष्यासाठी आपलीशी केली आहे. सध्याच्या या परिस्थितीत उद्याच्या समाजाचे आपल्या मनात कोणते कल्पनाचित्र आहे, हा मुद्दा मला कळीचा वाटतो. हे कल्पनाचित्र चळवळींतून समाजातील अनेक स्तरांत पोहोचविणे आणि त्या कल्पनाचित्राकडे जाण्याचा मार्ग म्हणून शिक्षणात अनेक प्रयोग होणे हे तेवढेच महत्त्वाचे काम आहे. म्हणूनच या दोन्ही मुद्यांवर साधक-चर्चा होत राहणे गरजेचे आहे. परंतु उद्याच्या समाजाचे कल्पनाचित्र चितारण्यात आपण अनेक जण अडखळतो आहोत. अडखळण्याच्या शर्यतीत मी बराच पुढे असलो तरी अनेक अंगांनी रुजू शकणारी आणि विस्तारत जाणारी लोकशाही हेच मला सध्या उद्याच्या समाजाचे कल्पनाचित्र दिसते आहे.

prakashburte123@gmail.com

आनंद निकेतन : हेरिटेज स्कूल

वर्ध्याच्या सेवाग्रामधली 'आनंद निकेतन' ही शाळा गांधीविचार आणि नई तालीम शिक्षणपद्धती केंद्रस्थानी धरून तो मार्ग प्रत्यक्षात आणण्यासाठी झटत आहे.

एन.सी.ई.आर.टी.ने या शाळेची 'हेरिटेज स्कूल' म्हणून निवड केलेली आहे. स्वच्छता आणि स्वावलंबन, तसेच शेती, शेतमालाची विक्री, सूतकताई, शिवणकाम, भरतकाम असे विविध उपक्रम या मराठी शाळेत शिक्षणाचे माध्यम बनलेले आहेत.

शब्दरंग

मागच्या लेखाच्या शेवटी आपण रुमालाबद्दल बोललो होतो. डोक्याला बांधायचे चौरसाकृती वस्त्र असा त्याचा अर्थ आहेच; तसाच, ह्या शब्दाचा अर्थ मूळ फारसीतून आलेला रु म्हणजे चेहरा आणि चेहरा पुसण्याचे साधन म्हणजे वस्त्र असाही आहे. अशाच अर्थाने आपण तो आजही वापरतो. नेहमी रुमाल वापरणाऱ्यांना रुमाल्याही म्हणत. शिवाय पूर्वी महत्त्वाची कागदपत्रे रुमालात गुंडाळून ठेवत. ही कागदपत्रे सांभाळणाऱ्यांना, म्हणजे कुळकर्णी-देशपांड्यांना, त्या कामासाठी बहाल केलेल्या जमिनीसही रुमाल म्हणण्याची पद्धत होती. युद्धात शरण जायची वेळ आल्यावर डोकीचा रुमाल काढून तो निशाणासारखा दाखवत, म्हणून रुमाल ह्याचा अर्थ तहाचे निशाण असाही होतो. रुमालाच्या या अनेक अर्थांनी आपल्याला दम लागला असेल, घाम आलेला असेल तर रुमालानेच तो पुसून आपण पुढे जाऊ या.

रुमालाचा उपयोग मोजमापासाठीही करत. चौदा तसूंचा एक रुमाली गज, असे लांबी मोजण्याचे माप आहे. तसूभर असा एक शब्द आपण वाचत-ऐकत आलेलो आहोत, पण त्याचा अर्थ 'थोडेसे' असाच आपण सामान्यपणे घेतो. मधले बोट व अनामिकेची एकत्र रुंदी इतके हे तसूभराचे माप असते. अशा वीस किंवा काही ठिकाणी चोवीस तसूंचा एक गज होतो. एक गज म्हणजे दोन हात असेही मानलेले आहे. शिवाय सोळा तसूंचा एक रेशमी गज होई. आता हात कुणाचा, बोटे कुणाची त्यावर हे माप लहानमोठे होणार, म्हणूनच वजने-मापे प्रमाणित करण्याची गरज भासली असणार हे आपल्या लक्षात येते. ब्रिटनचा एक राजा पहिला जेम्स (१६०३-१६२५) याच्या पावलाचे माप एक फूट म्हणून प्रमाणित केले गेले होते. लांबीप्रमाणे वजनाच्या मापातही हिंदुस्थानी पद्धतीत मोठीच गंमत दिसते. सहज मजा म्हणून त्यातली एक रीत इथे देत आहोत. ८ खसखशीचे दाणे म्हणजे १ तांदूळ, ४ तांदूळ म्हणजे १ गहू, २ गहू म्हणजे १ रत्ती, ८ रत्ती (म्हणजे रक्तिका, गुंज किंवा लहान बी) = १ मासा, १२ मासे = १ तोळा, ५ तोळे = १ छटाक; सोळा छटाक म्हणजे एक शेर, दहा शेर म्हणजे एक धडा. आणि चार धडे म्हणजे एक मण. नमनाला धडाभर तेल अशी जी म्हण आपण वापरतो, त्यातला धडा तो हाच. अनेक ठिकाणी धड्याऐवजी घडा असा शब्दही वापरला जातो, तोदेखील येथे अर्थपूर्ण ठरतो. रात्री होणाऱ्या जागरण गोंधळाच्या वेळी संपूर्ण कार्यक्रम होईपर्यंत पोत किंवा मशाली पेटवलेल्या असतात. त्याला तेल लागते. 'पहिल्या नमनामध्येच जर धडाभर तेल जाळले तर मुख्य आख्यानाला काय शिल्लक उरणार', अशा अर्थाने ही म्हण वापरली जाते. धडा या शब्दाची ही गोष्ट श्रीमती विद्या मुळगुंद यांनी आवर्जून कळवली आहे.

धडा हा शब्द पाहू गेलात तर त्याचे अनेक अर्थ सापडतात. एखादे मोठे वजन जर हाताशी नसेल तर छोटे छोटे दगड एकत्र करून ते तयार केले जाते, त्यालाही धडा म्हणतात. यातूनच आलेला धड्याचा आणखी एक अर्थ म्हणजे अभंड. हा शब्दही आता विस्मृतीत गेल्यासारखा झालेला आहे. तेल आणायला बरणी घेऊन गेल्यावर बरणीचे वजन तेलाच्या वजनात धरले जाऊ नये म्हणून ते आधी तोलून घेतले जाते, यालाच अभंड किंवा धडा किंवा पासंगही म्हणतात. एखादी गोष्ट दुसऱ्या गोष्टीच्या तुलनेत खूपच अपुरी असेल तर ती 'पासंगालाही पुरत नाही' असे आपण म्हणतो, पण पासंग या शब्दाचा अर्थ मात्र आपण अंदाजानेच जाणून घेतलेला असतो. तराजूच्या पारड्यातील विषमपणा, किंवा तो काढण्यासाठी हलक्या वजनाची एखादी गोष्ट एका पारड्यात घालतात, ती म्हणजे 'पासंग'.

असेच दोन शब्द हल्ली मागे पडू लागले आहेत, म्हणून मुद्दाम त्यांची आठवण करून देत आहोत; आधण आणि विसण. पाणी गरम करण्याला, किंवा उकळी आणण्याला आधण आणणे म्हणतात. तसेच गरम झालेल्या पाण्यालाही आधण म्हणतात. मग ते आधण चहासाठी ठेवलेले असो वा भातासाठी वा अंघोळीसाठी. पाणी खूपच गरम झालेले असले आणि ते निववण्याची गरज असली तर त्यात जे गार पाणी घालतात, ते विसण. भातासाठी पाण्याला आधण आले की त्यात रोवळीत धुऊन ठेवलेले तांदूळ. घालायचे नसतात, टाकायचे तर नसतातच, वैरायचे असतात. गुरांना घालायच्या ओल्या-कोरड्या चाऱ्याला वैरण असे म्हणतात, आणि एका वेळी घरात जेवढा शिधा शिजतो, त्यालाही वैरा असा शब्द आहे. त्यावरून 'घरात मणाचा वैरा असणे', असा वाक्प्रचारही आहे. त्याचा अर्थ घरात मोठा परिवार आहे, (मणभराचे अन्न वैरावे लागते) असा होतो !

संजीवनी कुलकर्णी, नीलिमा सहस्रबुद्धे

विशेष आभार : डॉ. श्रद्धा कुंभोजकर,
इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ

शाळेची सुरुवात

मॅक्सीन बर्नसन

११ नोव्हेंबर २०१२ रोजी कमला निंबकर बालभवनच्या रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यात डॉ. मॅक्सीन बर्नसन यांनी माजी विद्यार्थी व शिक्षकांना उद्देशून केलेल्या भाषणाचा सारांश...

अगदी सुरुवातीला मला माझी वैयक्तिक पार्श्वभूमी सांगायची आहे, कारण यामध्येसुद्धा शाळेची काही बीजं आहेत असं मला वाटतं. माझा जन्म अमेरिकेतल्या एका लहान गावामध्ये झाला. माझे वडील नॉर्वेहून आले होते. ते कामगार होते. आम्ही काही गरीब नव्हतो पण सुखवस्तूही नव्हतो. माझी शाळा शासकीय होती – कॉमन स्कूल. तिथं सर्व तऱ्हेची मुलं – अगदी गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत – एकाच शाळेत जात. त्या त्या परिसरामध्ये जेवढी मुलं होती, ती त्या त्या कॉमन स्कूलमध्ये जात होती. ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती, असं मला वाटतं. या शाळेमध्ये तसंच हायस्कूलमध्ये असताना मला भारताबद्दल रस निर्माण झाला. माझा बारावीमधला पहिला शोधनिबंध Problems of Rural India, (ग्रामीण भारतातील समस्या) याबद्दल होता. नंतर मी कॉलेजमध्येसुद्धा भारताबद्दल अभ्यास केला.

पुढे काही काळ मी हायस्कूलमध्ये आणि कॉलेजमध्ये शिकवलं. मग कोलंबिया युनिव्हर्सिटीला गेले. तिथे लीला गुर्गुंटा – सैगल भेटली. ती मूळची कर्नाटकातली होती आणि कधीतरी परत भारतामध्ये जाऊन एक शाळा स्थापन करायची असं तिचं स्वप्न होतं. तिचं हे स्वप्न कुठंतरी माझ्या मनामध्येसुद्धा रुजलं, असं मला वाटतं. १९६३ साली मला इरावती कर्वे भेटल्या. भारतातल्या लोकांना मी इंग्रजी शिकवावं, असं त्यांनी मला सुचवलं. त्याच सुमारास दलितांच्या समस्या आणि त्यांची शिक्षणाची गरज याबद्दलही मला समजलं. १९६६ साली Socio Linguistic Variations in Phaltan's Speech या विषयावर काम करायला मी सुरुवात केली. त्या अनुषंगानं फलटणच्या मंगळवार पेठेत (दलित वस्तीत) माझा वावर सुरू झाला. माझ्या लक्षात आलं की माणसाचं बोलणं हे जातीवर अवलंबून नसतं, तर शिक्षणावर अवलंबून असतं आणि शाळेमध्ये जी प्रमाणभाषा शिकवली जाते, तिचा पुढे समाजजीवनात फार उपयोग होतो. याच सुमारास मी जाई निंबकरांबरोबर अमेरिकन विद्यार्थ्यांना मराठी शिकवण्यासाठी साहित्य तयार केलं. १९७८ साली मी भारतीय नागरिकत्व घेतलं. या सुमारास देशभर अनौपचारिक शिक्षणाबद्दल खूप विचार चालू होता. अनेक ठिकाणी गरीब, वंचित मुलांना शाळेत आणण्याचं किंवा त्यांना शाळेबाहेर शिकवण्याचं काम चालू होतं. मलाही शालाबाह्य मुलांना लिहायला – वाचायला शिकवण्यात रस वाटू लागला. सहज विचारणा केली तेव्हा अशीच पाच-सहा शालाबाह्य मुलं माझ्याकडे शिकायला येऊ लागली. हीच खरी प्रगत शिक्षण संस्थेची सुरुवात होती.

पुढे माझ्या लक्षात आलं की आपण मुलांच्या वस्तीमध्ये जाऊन शिकवणं जास्त चांगलं. मग मंगळवार पेठेत 'आपली शाळा' हे साक्षरतेचं काम चालू झालं. याला जाईनं चांगली दिशा दिली. भारतीय भाषांमध्ये प्रत्येक अक्षराला एक उच्चार आणि एका उच्चाराला एक अक्षर असतं, (काही अपवाद वगळता.) त्याचा उपयोग शिकवताना करायला हवा असं ठरलं अन् प्रगत वाचन पद्धतीची सुरुवात झाली. तोपर्यंत लोक

म्हणू लागले होते की एक पूर्ण वेळेची शाळा सुरू करा. मला मात्र फक्त दलितांच्या शिक्षणासाठी काम करणं पुरेसं वाटत होतं.

त्याचवेळी इथे आणखी एक गोष्ट घडली. जाईची नात म्हणजे डॉ. मंजिरी निमकरांची मुलगी समीरा चार वर्षांची झाली, तेव्हा तिच्या आईनं तिला शाळेमध्ये पाठवलं. समीरा दोन-तीन दिवस शाळेमध्ये गेली. पण शेतावरच्या मोकळ्या वातावरणात वाढलेल्या समीराला शाळेतल्या बंदिस्त वातावरणात डांबून ठेवणाऱ्या मास्तरणी काही आवडेनात. मग तिनं जाहीर करून टाकलं की ती पुन्हा कधीच शाळेत जाणार नाही. मी तिला विचारलं, ''तू माझ्याकडे येशील का?'' मी मे महिन्यापुरती Kindergarten म्हणजे बालोद्यान सुरू करणार आहे.'' समीरानं विचारलं की तिथं मास्तरीण येणार आहे का? मी नाही म्हटलं आणि मग ती तयार झाली.

जिथं मंजूताई मतिमंद मुलांसाठी शाळा चालवत होत्या, तिथंच महिनाभर बालवाडी चालवायची, अशी आमची कल्पना होती. बालवाडी चालवायला खूप मजा आली. साधारण ३५ मुलं, चांगली मोठी जागा, त्यामुळे भरपूर नाच, गाणी असं सगळं छान चाललं होतं आणि हे आता बंद होता कामा नये असं वाटत होतं.

सुरुवातीला फक्त बालवाडी म्हटलं होतं, पण मुलं पुढं पहिलीला कुठं जाणार, असा प्रश्न निर्माण झाला आणि मग शाळा सुरू केली. इयत्ता पहिली नंतर मग पुढं नैसर्गिक वाढीनं दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, असं करत करत दहावीची पहिली बॅच १९९७ साली बाहेर पडली.

हे सर्व चालू असताना सुरुवातीला काही तत्त्वं मनामध्ये ठरवली होती. पहिली गोष्ट म्हणजे शाळा आनंददायी असावी. जो अनुभव समीराला पहिल्या शाळेत मिळाला तसं आपल्याकडे होता कामा नये. शिक्षक आणि मुलं एखाद्या कुटुंबासारखी असावीत. याशिवाय शाळा सर्वांसाठी हवी. म्हणजे अमेरिकेमध्ये मी ज्या प्रकारच्या शाळेत शिकले होते, जिथे गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्व प्रकारची मुलं होती, अशीच शाळा इथं असली पाहिजे. अर्थात ही शासकीय शाळा नसणार, पण निदान अनुसूचित जाती-जमाती, भटके-विमुक्त, इतर मागास, बिगर मागास अशी सर्व मुलं एकत्र हवीत. मुलं आणि मुली समान असंही आम्ही पहिल्यापासूनच मनात ठेवलं होतं.

आणखी एक गोष्ट म्हणजे शाळा धर्मनिरपेक्ष असावी. मला पाहून सुरुवातीला बऱ्याच लोकांच्या मनात ख्रिस्ती शाळा सुरू करणार की काय, असा प्रश्न असायचा. पण शाळा ख्रिस्ती असणार नाही आणि हिंदूसुद्धा असणार नाही, हे माझ्या मनात पक्कं होतं. पूर्ण धर्मनिरपेक्ष म्हणजे काय याबद्दल आम्हाला प्रश्न पडायचे. अगदी सुरुवातीला आम्ही शाळेमध्ये दिवाळी जोरात साजरी करायचो. त्यावेळी काही काळासाठी आमच्याकडे मुंबईहून आलेल्या प्रमिला फातर्पेकर म्हणाल्या, ''कसली तुमची धर्मनिरपेक्ष शाळा? तुम्ही दिवाळी साजरी करता !'' कुठल्या प्रार्थना घ्यायच्या, कुठले धडे घ्यायचे, हे फार अवघड प्रश्न होते. कार्यक्रमाच्या वेळेस काय-काय करायचं, म्हणजे दिवा लावणं योग्य आहे का, नारळ फोडायचा की नाही हे ठरवावं लागायचं. हे हास्यास्पद वाटेल पण शेवटी प्रतीकं (सिम्बल्स) महत्त्वाची असतात. ही शाळा सगळ्यांच्यासाठी आहे आणि जे आपलं धोरण आहे, ते सगळ्यांना सामावून घेणारं असणं फार गरजेचं आहे, असं वाटलं.

दुसरं म्हणजे मराठी माध्यमाची शाळा असावी याबद्दल सुरुवातीपासून अगदी आत्तापर्यंत ठाम राहिलो. पण त्याबरोबर इंग्लिशसुद्धा शिकवायचं ठरवलेलं होतं. कारण इंग्लिश महत्त्वाचं आहे, हे नाकारता येत नाही. त्यातील आव्हानांबद्दल स्वतंत्रपणे बोलावं लागेल, कारण ती बरीच आहेत. संपूर्ण भारतामध्येच शिक्षणमाध्यम आणि इंग्रजीचं आव्हान हा खूप मोठा प्रश्न आहे.

या तत्त्वांमध्ये असाही विचार केला होता की शिक्षणपद्धती नावीन्यपूर्ण किंवा प्रगत (Progressive) असावी. वास्तविक ही पद्धती जगासाठी काही नवीन नाही, पण इथं ती रुजलेली नव्हती. जी काही चांगली, विद्यार्थीकेंद्री किंवा बालकेंद्री शिक्षणपद्धत आपण वापरू शकतो, ती इथं वापरण्याचा आम्ही प्रयत्न केला. मुलांचे अनुभव शाळेमध्ये आणायचे, मुलांची भाषा शाळेमध्ये आणायची, यावर भर होता. मला आठवतं की

एकदा शाळेतल्या अरुणाताई मुलांना गुळस्करांच्या गोठ्यामध्ये घेऊन गेल्या होत्या. मुलांनी गाई-म्हशी पाहिल्या आणि नंतर त्यांची चित्रं काढली. नंतर अरुणाताईंनी मुलांनी जशी वाक्यं सांगितली, तशीच ती फळ्यावर लिहिली. 'गाय वासराला चाटतिया', असं एका मुलीनं सांगितलं आणि तसंच अरुणाताईंनी लिहिलं. अशा प्रकारे नेहमीच मुलांची भाषा स्वीकारली गेली. 'ती शुद्ध नाही', असं कोणी म्हणू नये, याची काळजी घेतली गेली.

पर्यावरणाविषयी अगदी सुरुवातीपासूनच खूप विचार केला गेला. मला आठवतं, अगदी पहिल्या दिवशी बाकं आली तेव्हा आशाताईंनी म्हटलं, 'ही बाकं बनवण्यासाठी काही झाडं तोडावी लागली असतील.

म्हणजे आपण वापरतो त्या प्रत्येक वस्तूमध्ये पर्यावरणाकडून आपण काहीतरी घेत असतो आणि त्याची जाणीव ठेवणं फार गरजेचं आहे.'

अगदी शेवटचं तत्त्व हे होतं की ही शाळा म्हणजे शैक्षणिक वाळवंटातलं एक सुंदर बेट असता कामा नये. सगळ्या शाळा, विशेषतः सरकारी शाळांसाठी हे एक साधनकेंद्र असावं. कसं शिकवायचं, काय नवीन पद्धती वापरायच्या, काय नवीन शैक्षणिक विचार घेता येईल, या विषयी त्या शाळांना मदत करायची, अशा स्वरूपाचं काम हे साधन केंद्र करेल, असं ठरवलं.

तर अशा प्रकारे साधारण आठ तत्त्वं डोळ्यासमोर ठेवून कमला निंबकर बालभवन सुरू केली.

'शाळेचं नाव काय ठेवायचं' असा प्रश्न समोर आला. मी काही दिवस अगोदरच कमलाबाई निंबकराच्या आठवणींच्या एका पुस्तकाचं

संपादन केलं होतं. त्यांच्या कामानं मी खूप प्रभावितही झाले होते. Occupational Therapy and Rehabilitation (व्यवसायोपचार आणि पुनर्वसन) मध्ये त्यांनी केलेलं काम जगभर लोकांना माहीत होतं. पण शिक्षणामध्येसुद्धा त्यांनी मूलभूत काम केलं होतं, हे फारसं कुणाला माहीत नव्हतं. फ्रोबेल पद्धत त्यांनीच पहिल्यांदा भारतात आणली आणि मुंबईमध्ये न्यू खार स्कूल सुरू केलं. या सगळ्यामुळेच या शाळेला कमला निंबकर बालभवन असं नाव देण्याचं मी ठरवलं.

पुढे १९९५ साली मंजूताई शाळेमध्ये यायला लागल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली 'नेचर क्लब' सुरू झाला आणि त्यामार्फत खूप चांगलं काम झालं. मुलं विंचुर्णीला आणि इतर ठिकाणी शैक्षणिक सहलींसाठी जात होती. मला आठवतं की काही मुलांनी दुर्बिणीतून पहिल्यांदाच पाहिलं, तेव्हा एक नवीनच जग त्यांना दिसलं. पुढे काहीजण सुनील करकऱ्यांबरोबर ताडोबाला गेले.

हळूहळू मंजूताईंचं काम वाढत गेलं. त्यांनी २००८ मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमधून Master of Arts in Elementary Education केलं. त्यात त्यांना सुवर्णपदक मिळालं. निसर्गतःच त्या उत्तम व्यवस्थापक आणि शिक्षिका होत्या. या कोर्समुळे त्यांना एक वैचारिक आणि तात्त्विक बैठक मिळाली. मी आपल्या CLLC (Centre for Language, Literacy and Communication) मध्ये जास्त लक्ष द्यायला लागले आणि मंजूताईंनी व्यवस्थापन, इंग्लिश शिकवणं आणि शाळेच्या इतर अनेक गोष्टी हाती घेतल्या. महत्त्वाचं म्हणजे शाळेची 'मुख्याध्यापिका' म्हणून त्या रुजू झाल्या.

आम्ही जेव्हा CLLC सुरू केलं त्यामध्येसुद्धा मंजूताईंनी वाचन-लेखन सुधार प्रकल्पाची महत्त्वाची जबाबदारी घेतली. सुरुवातीला जिल्हा परिषदेच्या चार-पाच शाळांमध्ये काम चालू होतं. नंतर वीस आणि मग टाटा ट्रस्टच्या ग्रँटमुळे त्रेपन्न शाळांपर्यंत आम्ही गेलो. त्याचबरोबर Everyday English Programme सुरू झाला. Everyday English ची पुस्तकं, शिक्षकांसाठी संशोधन शिष्यवृत्ती, एक चांगलं ग्रंथालय हे सर्व या CLLC च्या माध्यमातून झालं. ही शाळा इतर शाळांसाठी साधनकेंद्र असावी असं जे स्वप्न होतं, ते बऱ्याच अंशी सफल झालं.

गेल्या २५ वर्षांचं 'रिपोर्ट कार्ड' पाहिलं तर लक्षात येईल की शाळेची अनेक उद्दिष्टं पूर्ण झालेली आहेत. आज कदाचित तुम्हा बहुसंख्यांना चांगलं इंग्लिश येत असेल पण तरी थोडी लवकर संभाषण कौशल्यं यावीत असं वाटतं. याबाबतीत अजून सुधारणेला वाव आहे. पर्यावरणाबद्दलही आज जरा कमी रस जाणवतो. ताडोबाला जाऊन भटकण्यात कदाचित मुलांना आज रस नसेल पण इतर गोष्टींमध्ये असेल.

कालपरत्वे नवीन आव्हानं, समस्या येतात. Global forces चा सुद्धा शिक्षणावर फार मोठा प्रभाव पडत चाललेला आहे. कंपन्या शिक्षणासाठी पैसे द्यायला तयार असतात. त्यांचा स्वतःचा अजेंडा असतो. ज्या स्वप्नांपासून आपण सुरुवात केली ते आपलं स्वप्न आणि त्यांचं स्वप्न कितपत जुळतं आहे, हे माहीत नसतं.

तीच गोष्ट देणग्यांची. ज्या वेळी अनेक माणसांकडून थोडे थोडे पैसे येतात तेव्हा त्या संस्थेला जास्त स्वातंत्र्य असतं. एका मोठ्या देणगीदाराकडून सगळे पैसे आले तर त्याच्याप्रमाणे काम करावं लागतं. He who pays the piper calls the tune अशी एक म्हण आहे. म्हणून आपण मोठ्या कंपन्यांकडून देणग्या घेताना विचार करतो.

एकूण ज्या स्वप्नाबरोबर आपण हे सुरू केलं, ते स्वप्न धरून आणि गरजेप्रमाणे बदलून पुढं जाणं गरजेचं आहे. कारण जुन्याला आपण पूर्णतः काही चिकटून राहू शकत नाही. काळ आणि काळाची गरज पाहून आपणसुद्धा बदलायला पाहिजे. शक्यतोवर जे चांगलं आहे ते धरायचं, काही नवीन गोष्टी आणायच्या, हेच आव्हान सर्वांसमोर आहे.

मॅक्सीन बर्नसन, क.निं.बा.च्या संस्थापक आणि भाषा वैज्ञानिक.

बिन घंटेची तगडी शाळा

मंजिरी निमकर

टण टण टण घंटा होते. गणवेश घातलेली मुलं पळापळ करत वर्गात किंवा मैदानावर जमा होतात. लाउडस्पीकरवरून राष्ट्रगीत आणि ठरलेली प्रार्थना म्हटली जाते. पुढे उभी राहिलेली मुलं उगाच म्हटल्यासारखं करतात, मधली तोंडं हलवतात. मागची तर तेवढेही कष्ट घेत नाहीत. प्रार्थना संपताच तास सुरू होतो. शिक्षक येतात. फळ्याशेजारी उभं राहून शिकवू लागतात. क्वचित ते बाकांच्या रांगेतून फिरतात. घंटा होते. तास बदलतात. मधल्या सुट्टीच्या घंटेला मुलं पाण्याच्या लोंढ्यासारखी वर्गातून बाहेर पडतात – पळतात – धडपडतात. पुन्हा घंटा, पुन्हा तास. शेवटची घंटा, शाळा सुटते. मुलं कोंडवाड्यातून बाहेर पडणाऱ्या जनावरांप्रमाणे पळत सुटतात. जणू शाळेत डांबूनच ठेवलं होतं.

शिकणं – इथंही

कला सर्वत्र

कमला निंबकर बालभवनमध्ये घंटाच नाही ! शिक्षकच आपापलं घड्याळ पाहून तास सोडायचा किंवा भरवायचा ते ठरवतात.

शाळेचं प्रतीक म्हणून अनेक सिनेमांतून किंवा जाहिरातीतून दाखवण्यात येणारी घंटाच क.निं.बा.नं मोडीत काढली. तर अशी ही आमची बिन घंटेची तगडी शाळा !

शाळेचं मोकळं वातावरण

शाळेची रचना अशी आहे की इथं मुलांना आपलंसं वाटतं. एका छोटेखानी अंगणात दोन छोटे पार आहेत. एक छोटंसं स्टेज आणि मल्लखांबही आहे. एक घसरगुंडी, जंगलजीम, झोका आणि नववी – दहावीच्या प्रौढ मुलामुलींसाठी गंभीर चर्चा करण्यासाठी एक मोठा सिमेंटचा पाईप. या पाईपवर ही मुलं घोळक्यानं बसतात. बालवाडी, पहिली, दुसरीच्या मुलांना पाईपवर बसून गप्पा मारणं अगदीच कंटाळवाणं वाटतं. त्यापेक्षा ती पाईपमध्ये घुसून बसतात – डबाही खातात.

याच अंगणात दोन मोठी शिरीषाची झाडंही आहेत. तिथं छान

कौशल्य 'घडवण्याचे'

सावली असते. या सावलीत अनेकदा कुठल्याशा वर्गानं आपल्या छंदांचं किंवा टाकाऊपासून टिकाऊचं प्रदर्शन भरवलेलं असतं. किंवा कधी कधी बालवाडी – पहिलीच्या वर्गानं तर चक्क मंडईच भरवलेली असते. मेथी, कोथिंबीर, लिंबू, टोमॅटो, बटाटे विकले जातात आणि मुलांना घ्यायला आलेले पालक हौसेनं भाजी खरेदी करतात. मुलांचं हिशोबाचं, संभाषण कौशल्याचं शिक्षण या मंडईत अगदी सहज आणि कौतुकाच्या वातावरणात घडतं.

पलीकडेच एका झाडाखाली सावलीच्या कोपऱ्यात मुलामुलींचा एक मिश्र गट लगबगीनं पण पूर्ण एकाग्रतेनं काहीतरी करताना आपल्याला दिसतो. त्यांना आज वर्गात प्रकल्प सादर करायचा असणार ! त्याच्या तयारीचं शेपूट अगदी शाळा सुरू होईपर्यंत चालू राहतं.

थोडंसं पुढे आलात की तुम्हाला दिसतं ते शाळेचं स्टेज. या जागेवर पहिली, दुसरी, तिसरीची मुलं निर्विवाद सत्ता गाजवतात. त्यांचा उघडा वर्ग नेहमी इथंच भरलेला असतो. इथल्या फरशांवर चित्रं काढणं, चिंचोके – बिया लावून अक्षरं गिरवणं अशी त्यांची कामं चालू

मेंदी रेखाटताना

असतात. थंडीच्या तिरप्या, कोवळ्या उन्हात लक्षवेधी, रंगीबेरंगी कानटोप्या, स्वेटर घालून बसलेली मुलं शिकताना फार मोहक दिसतात.

असा असतो इथला दिवस

शाळेच्या वेळेच्या आधी येऊन मैदानात खेळण्याचा अड्डा टाकणं, हा मुलांचा आवडता उद्योग ! शाळेच्या अंगणापलीकडे एक छोटंसं मैदान आहे. या मैदानात क्रिकेटपासून गोट्यांपर्यंतचे अनेक खेळ मुलं खेळत असतात. शाळेत मैदानावर कधीही जाऊन खेळायला शाळेचं नेहमीच प्रोत्साहन असतं. आजकालच्या विडीओगेम्सच्या जमान्यात गोट्या खेळण्याचंही शाळेत कौतुक होतं. सारं मैदान असं अनेक खेळ खेळत स्वत:च फुलून आलेलं असतं आणि एका क्षणी मात्र सगळेजण आपापला खेळ आवरून शाळेकडं हळू हळू चालू लागतात. प्रथम बघणाऱ्या एखाद्याला याचं आश्चर्यच वाटावं इतकं मुलांचं हे वागणं अनपेक्षित असतं. आता शाळेची वेळ झालेली आहे, हे इथल्या मुलांना बरोब्बर कळतं ! त्यासाठी घंटा वाजवावी लागत नाही.

सकाळच्या शाळेतली, घरी जाण्यासाठी पालकांची वाट पाहणारी बालवाडीची मुलंच फक्त तिथं उरतात आणि प्रार्थना हॉलमधून प्रार्थनेचे सूर ऐकू यायला लागतात. तबला, पेटी, टाळ, ट्रायांगल ही सर्व वाद्यंही इथं मुलंच वाजवतात. प्रार्थनेनंतर ज्या गटाची बारी असेल त्या गटातील मुलं त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या बातम्यांची टिपणं घेऊन तयार असतात. ते ती वाचून दाखवतात. 'आजचं कोडं', 'आजचा विनोद' सांगून झाल्यावर समोर ठेवलेला LCD प्रोजेक्टर चालू केला जातो. त्याला संगणक जोडला जातो. नववीची मुलं अतिशय गंभीरपणे ही सगळी जोडणी करतात. माईक सिस्टीम जोडून साऊंड चेक करतात.

आज सायली हॉटेलमधून वाया जाणाऱ्या अन्नाबद्दलचा आपला प्रकल्प सादर करणार असते. एकेक स्लाईड पुढे सरकवत ती वीस मिनिटं व्यवस्थितपणे सादरीकरण करते. मुलं टाळ्या वाजवतात. मग प्रश्नोत्तरं सुरू होतात. हा प्रकल्प तिनं स्वतः फिरून माहिती गोळा करून केल्यानं तिच्या उत्तरांमध्ये खणखणीत आत्मविश्वास झळकतो. अर्थात श्रोतृवर्गही काही कमी नसतो.

पाचवीतल्या प्रथमेशनं सायलीला विचारलं, ''हॉटेलमधल्या अन्नातील मसाल्यामुळं गांडुळांना त्रास होतो का?'' सायली जरा गडबडली. गांडुळांच्या 'मसाला' समस्येवर तिनं विचार केला नव्हता. पण तिनं 'उद्या बघून सांगते' असं गंभीरपणे सरळ सांगितलं. प्रथमेशलाही बरं वाटलं. माहीत नसलं तर मोकळेपणानं तसं सांगायचं, ही इथली सवय आहे. एखादी गोष्ट माहीत नसली तर काही बिघडत नाही ! मुलं असं वागतात, कारण शिक्षकही त्यांना माहीत नसलं तर काहीतरी बोलून वेळ मारून नेत नाहीत. बघून सांगतो म्हणतात किंवा सगळ्यांना घेऊन ग्रंथालयात जातात. ग्रंथालयात सर्वजण एकत्रितपणे माहीत नसलेली गोष्ट शोधण्याची मजा लुटतात.

वैचारिक बैठक

अशा प्रकारे चालणाऱ्या शाळेची वैचारिक बैठक फारच पक्की असावी लागते. डॉ. मॅक्सीन बर्नसन यांनी १९८७ साली ही वैचारिक बैठक ठरवून मगच ही शाळा सुरू केलेली आहे.

१. शाळेचं वातावरण मोकळं, आनंदी असावं.
२. शाळेत समाजाच्या सर्व स्तरातील मुलं असावीत. मुलामुलींची संख्या समान असावी.
३. शाळा मराठी माध्यमाची असावी. मात्र इंग्रजीचं व्यावहारिक महत्त्व जाणून एक विषय म्हणून तोही उत्कृष्ट शिकवला जावा.
४. वर्गाची पटसंख्या मर्यादित असावी.
५. शिक्षणपद्धती बालकेंद्री व अभिनव असावी.
६. शाळेला कुठलाही धार्मिक संदर्भ नसावा.
७. मुलांमध्ये पर्यावरणाची जाण व संवेदनशीलता यावी असा प्रयत्न असावा.
८. इतर शाळांमध्ये, विशेषतः शासनाच्या शाळांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी ही शाळा साधनकेंद्र म्हणूनही वापरली जावी.

आज २५ वर्षांनंतर क.निं.बा. या तत्त्वांवर भक्कम उभी आहे. ही तत्त्वं अंगीकारत असताना एक प्रकारे तारेवरची कसरतच संस्थाचालकांना करावी लागते. वरपांगी सोप्या वाटल्या तरी 'शाळेला धार्मिक संदर्भ नसावा' यासारख्या गोष्टी अंगीकारण्यास कठीण आहेत. कुठल्याही शाळेत धर्मनिरपेक्षता हे तत्त्व सहजपणे म्हटलं जातं, पण प्रत्यक्षात मात्र विद्येची देवता म्हणून शारदास्तवन त्या शाळेच्या प्रार्थनेचा भाग बनवलेलं असतं किंवा संस्कृती म्हणून तिथे गणेशोत्सवही साजरा केला जातो. हिंदू-बहुल समाज असल्यानं आपल्या देशात धार्मिक संदर्भ गृहीत धरले जातात. क.निं.बा.मध्ये कटाक्षानं तत्सम आचार, विचार, प्रचार टाळले जातात. तसेच या शाळेत समाजातील सर्व स्तरांतून मुलं येतात. धर्मजातींइतकाच आर्थिक स्तरही वेगवेगळा असतो. त्यामुळे पालकांच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज घेऊन त्यानुसार फी आकारली जाते.

क.निं.बा. ही मराठी माध्यमाची शाळा आहे. प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच झालं पाहिजे, असा शाळेचा आग्रह आहे. मातृभाषेतून शिकायला मिळणं हा मुलांचा हक्कच आहे. त्यामुळे मुले आनंदात व तणावरहित वातावरणात शिकतात.

मर्यादित पटसंख्या आणि एकच तुकडी या शाळेत दिसते. प्रत्येक नव्या वर्गात ३५-३६ मुलांनाच प्रवेश मिळतो.

अशाप्रकारे चालणारी शाळा निश्चितच सुखकारक आहे. पण किती मुलांना याचा लाभ मिळणार? इतर हजारोंचं काय? आपण सुरू केलेलं काम वाळवंटातील मरूद्यानाप्रमाणे नसावं, असं डॉ. मॅक्सीन बर्नसन यांचं मत होतं. त्यामुळे क.निं.बा. इतर शाळांमध्ये, विशेषतः शासनाच्या शाळांमध्ये शैक्षणिक अनुभव समृद्ध करण्यासाठी साधनकेंद्र म्हणून काम करते. संस्थेच्या 'शिक्षणविस्तार केंद्राच्या' माध्यमातून वाचन-लेखन सुधार प्रकल्प आणि अलीकडेच स्थापन झालेल्या सेंटर फॉर लँग्वेज, लिटरसी अँड कम्युनिकेशनच्या अंतर्गत Every day English प्रकल्पाच्या माध्यमातून हे काम केलं जातं.

लवचीक वर्गरचना

निंबकर शेती संशोधन संस्थेनं ९० वर्षांच्या करारावर दिलेल्या तीन गोदामांमध्ये ही शाळा सुरू झाली. ३०-४० मुलं आणि काही हजार फूट जागा, मुक्त विचार आणि गोडाऊनची प्रशस्तता, नैसर्गिकरीत्याच वर्गरचनेत झिरपली. पुढं शाळेचा विस्तार झाल्यावर आणि खोल्यांचं बांधकाम होतानाही तीच विचारसरणी अंगीकारली गेली. गरजेनुसार अधिक बांधकामही केलं गेलं. क.निं.बा.मध्ये एका रांगेत ठेवलेले बाक आणि अशा बाकांच्या तीन चार ओळी असं चित्र दिसत नाही. मुलांना बसायला खुर्च्या आणि लिहायला टेबलं आहेत. ही टेबलं कधी ओळीत, तर कधी गटात, तर कधी गोलमेज परिषदेप्रमाणं मध्यभागी मोकळी

मीसुद्धा भाजी चिरतो

जागा ठेवून चारी बाजूंना लावलेली असतात. वर्गरचना पक्की त्यात तुम्ही शिक्षण बसवा असं इथं मानलं जात नाही. शैक्षणिक गरजेनुसार वर्गरचना लवचीक असते आणि अगदी तासातासालासुद्धा ती बदलू शकते. मुलांना त्यांच्या कामाच्या सोईनुसार बसता येतं. त्यात मुलगे-मुली शेजारी शेजारी बसतात. वेगळेपणाचा बाऊ केला जात नाही, सर्वांनाच नैसर्गिक सहजतेनं वागवलं जातं. वर्गांच्या भिंतींवर रंगीबेरंगी फलक असतात. या फलकांवर मुलांची चित्रं, कविता, कथा, हस्तकला अशा गोष्टींचं प्रदर्शन पहावयास मिळतं. कधी शिक्षकांनी संदर्भादाखल तयार केलेल्या आकृत्या किंवा तक्तेही आढळतात. मात्र बाजारातून विकत आणलेलं तयार शैक्षणिक साहित्य इथं अडकवलं जात नाही. वर्गात शिक्षकांची जागा कधी फळ्याजवळ, कधी मुलांच्या गटात असते, तर

हेही मूल्यमापनच

कधी मुलं शिकवत आहेत आणि – शिक्षक मागं बाकावर बसलेले आहेत, असंही आढळेल.

खास आमची शिक्षणपद्धती

क.निं.बा.मध्ये इयत्ता पहिलीमध्ये वाचन-लेखन शिकवण्यासाठी मुद्दाम तयार केलेली आपली अशी एक खास शिक्षणपद्धती आहे. डॉ. मॅक्सीन बर्नसन यांनी देवनागरी लिपी व मराठी वर्णमालेच्या वैशिष्ट्यांना केंद्रस्थानी ठेवून, मुलांच्या भावविश्वाचा विचार करून ही प्रगत वाचनपद्धत विकसित केलेली आहे.

बालवाडीपासून सातवीपर्यंत 'होमी भाभा विज्ञानकेंद्रा'च्या अरुण मावळणकर यांच्या मार्गदर्शनाखाली, कृतीतून गणित शिक्षण दिलं जातं. गणिती खेळ, कोडी, कार्यानुभवातून भौमितिक आकृत्या तयार करता करता मुलं गणिताची भीती विसरतात.

वर्गातील सर्वांना समजेपर्यंत शिकवायचं, हे शाळेचं धोरण आहे, मग भले दोन धडे झाले नाहीत तरी चालेल ! शिक्षण विद्यार्थीकेंद्री असल्यानं मुलं त्यांच्या स्वाभाविक क्षमतेनुसार शिकण्याच्या उद्योगात

चित्रवाचनाकडून वाचनाकडे

सतत मग्न असतात, त्याचमुळे गेल्या पंधरा वर्षात बारा वेळा आणि सलग दहा वेळा दहावीचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे.

इथं 'शिकवण्यांना' परवानगी नाही. समजलं नाही तर शिक्षकांना पुन्हा पुन्हा विचारा, आपला आपण स्वाध्याय करा; असं धोरण असल्यानं मुलं आळशी बनत नाहीत. गाईड्सनाही शाळेत प्रवेश नाही. स्वतःचा स्वतः अभ्यास करण्याइतकी मुलं मोठी झाली की, म्हणजे साधारण आठवीपासून स्पर्धापरीक्षांना त्यांना बसवलं जातं. चित्रकला, संगीत, तबला, योगासनं या परीक्षांना मात्र हवं त्याला त्याआधीही बसता येतं.

शिक्षकाचं व्यक्तिमत्त्व फुलावं म्हणून

क.निं.बा.मध्ये मुलांना जसं वेगवेगळ्या गोष्टी करून पाहण्याचं स्वातंत्र्य असतं तसं शिक्षकांनाही वेगवेगळे प्रयोग व उपक्रम करण्याचं स्वातंत्र्य असतं. शिक्षकांच्या नवकल्पनांना तात्त्विक बैठक देऊन प्रयोगाची व नोंदी ठेवण्याची पद्धती ठरवून त्या कल्पनेचं नवोपक्रमात रूपांतर करण्यास इथं मदत केली जाते. गेली सात-आठ वर्षे दर वर्षं कमीत कमी एक तरी शिक्षिका राज्य शिक्षण प्रशिक्षण व संशोधन संस्थेतर्फे घेतल्या जाणाऱ्या नवोपक्रम स्पर्धांमध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळविते. दोन शिक्षिका राज्य पातळीपर्यंत पोचल्या आहेत.

शाळेनं आपल्या शिक्षकांना वेगवेगळी प्रशिक्षणं घेण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. विशाल आंधळकर व कल्पिता दंडवते यांनी पुण्याच्या भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ एन्व्हायरनमेंट एजुकेशन ॲन्ड रिसर्चमधून पर्यावरण पदविका प्राप्त केली. तर वर्षा लाळगे यांना होमी भाभा विज्ञान केंद्रात गाणिततज्ज्ञांबरोबर काम करायला मिळालं. अनेक शिक्षकांना शैक्षणिक सहलीतून शांतीनिकेतन, कणवू, श्रमिक सहयोग, दिगंतर, तिलोनिया अशा अनेक ठिकाणी होणाऱ्या शैक्षणिक प्रयोगांची ओळख झाली. ताडोबा, दांडेली येथील निसर्ग समजावून घेता आला.

शिक्षकांच्या साप्ताहिक सभेमध्ये कुणी कुणी केलेले नवीन प्रयोग सर्वांसमोर मांडले जातात, काही पुस्तकांचं वाचन होतं. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन असो किंवा शिक्षणाच्या हक्काचा अधिनियम असो, तो समजावून घेतला जातो. ठिकठिकाणच्या शिक्षणतज्ज्ञांनी मांडलेल्या अभ्यासांची ओळख करून घेतली जाते. याशिवाय शाळेला भेट द्यायला येणाऱ्या निरनिराळ्या लोकांबरोबर झालेल्या चर्चांमधूनही शिक्षक घडत असतात.

पालकसभा

पालकसभेत नेहमीच शाळेची तत्त्वं समजावून सांगितली जातात. वर्गनिहाय सभेत मुलं पालकांसमोर प्रत्येक विषयाचं सादरीकरण करतात. कविता, गाणी म्हणतात. हिंदी किंवा इंग्रजी नाटुकलं सादर करतात. नकाशे काढतात. गणितंदेखील समजावून सांगतात. त्यामुळं मुलं काय शिकताहेत ते पालकांना समजतं.

नावीन्याचा ध्यास

आपल्या प्रत्येक कृती, उपक्रम, प्रयोगाकडे चिकित्सक नजरेनं पाहिल्यानं अनेक ठिकाणी आपण अधिक चांगलं करू शकतो असं आम्हाला वाटतं. येथूनच सुरू होतो नावीन्याचा ध्यास.

पाठ्यपुस्तकातील दुसऱ्या कुणाचे तरी अनुभव अभ्यासून प्रश्नोत्तरं लिहिण्यापेक्षा मुलांनाच नवनवे अनुभव देऊन लिहितं केलं तर मुलांचा भाषिक विकास अधिक चांगला होतो. या आणि अशा विचारातून कुणी भूमिती शिकण्यासाठी नक्षी बनविण्याचा प्रकल्प करतं तर कोणी भूरूपे शिकण्यासाठी ताथवड्याचा घाट गाठतं.

काहीतरी नवीन केल्याशिवाय सगळीच्या सगळी मुलं शिकत नाहीत, यशस्वी होत नाहीत. म्हणून साऱ्या शाळेनंच नावीन्याचा ध्यास घेतला आहे. शिक्षकही त्यामुळे उत्साही राहतात.

शाळेत होणाऱ्या विविध उपक्रमांची एक व्यवस्था असणं, वर्षानुवर्षं वेगवेगळ्या शिक्षकांनी, वेगवेगळ्या वर्गांवर ते राबवून त्यात भर घालणं. त्यातील अडचणी सोडवणं, संपूर्ण प्रक्रियेचा, दुसऱ्या कोणालाही वापरता येण्याजोगा लेखी दस्तावेज बनवणं हे शाळेचं ध्येय आहे.

साऱ्या सुविधा कुलुप-मुक्त

कमला निंबकर बालभवनमध्ये इतर शाळांमध्ये असतं तसं ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगीत हॉल, वर्गखोल्या आहेत. पण क.निं.बा.चं वैशिष्ट्य आहे ते त्याच्या वापरात. कुठलंच साहित्य कडी-कुलुपात नसतं. 'जरूर वापरा. जबाबदारीनं वापरा आणि शिका' हा मंत्र प्रयोगशाळेपासून संगणककक्षापर्यंत सगळीकडं लागू पडतो.

वाचन संस्कृती रुजावी म्हणून

ग्रंथालयात सुमारे ६४१२ पुस्तके व २३८ संदर्भ ग्रंथ आहेत. बालवाडीपासून मुलं ग्रंथालयाचा वापर करतात. ग्रंथालयात बंद कपाटं नाहीत. तर उघडी शेल्फं आहेत. गोष्टीची पुस्तकं, कादंबऱ्या, नाटकं, पुस्तकं, कवितासंग्रह यांच्याबरोबर विज्ञान, आरोग्य, गणित, पर्यावरण, इतिहास, भूगोल अशा अनेक विषयांची पुस्तकंही आहेत.

पहिलीपासून दर आठवड्याला ग्रंथालयाचा एक तास असतो. तासाला ताई एखाद्या गोष्टीचं प्रकट वाचन करतात. किंवा किशोर, चकमक, सृष्टीज्ञान, संदर्भ यासारखी मासिकं मुलांना वाचायला देतात. त्या तासाला मुलं आपल्या आवडीचं पुस्तक शोधून घरी घेऊन जातात. पुढच्या तासाला त्यांना ते पुस्तक परत आणायचं असतं. प्रत्येकाला आठवड्यात दोन पुस्तकं बदलता येतात.

पालकांनाही दहा रुपये इतकं नाममात्र मासिक शुल्क भरून पालक - ग्रंथालयाचं सदस्यत्व मिळतं. आणि घरी पुस्तकं वाचायला नेता येतात. पालकनीती, साधना, शिक्षणपत्रिका, अंतर्नाद यासारखं कोणतंही एक मासिक मुलांबरोबर पालकांसाठी घरी दिलं जातं. ते त्यांनी मुलांबरोबरच परत द्यावयाचं असतं. यामुळे मुलांबरोबरच पालकांच्यातही वाचनसंस्कृती रुजवली जाते.

विज्ञान, इतिहास, भूगोल, हिंदी यांसारख्या विषयांमध्ये प्रकल्प तयार करताना मुलं तासन्तास ग्रंथालयात बसून संदर्भ-पुस्तकांमधून माहिती गोळा करतात. समृद्ध ग्रंथालय व चांगली रुजलेली वाचन-संस्कृती यांच्यामुळे मुलं स्वतःची मतं, विचार, भावना व अनुभव अतिशय चांगल्या प्रकारे मांडू शकतात.

बालवाडीचा भक्कम पाया

क.निं.बा.मध्ये बालवाडीला आपली आपली अशी वेगळी मोठी जागा आहे. या जागेत गणित, भाषा, विज्ञानकोपरे, एक छोटं ग्रंथालय, मोठंसं बाहुलीघर, ठोकळे, आणि कलेच्या विविध साहित्याचाही एक कोपरा मांडलेला दिसतो. मुलं गटागटानं बसून खेळात दंग झालेली दिसतात. बालवाडीच्या ताई सर्वत्र फिरून मुलांच्या कामाची नोंद घेत असतात.

सर्वच कामं - सर्वांची !

लहान लहान गटांमध्ये मुलांना काही गोष्टी समजावून सांगत असतात किंवा वाचून दाखवत असतात. मुलांना औपचारिक शिक्षणासाठी लागणारी अनेक कौशल्यं उदाहरणार्थ लक्ष देऊन ऐकणं, प्रश्न विचारणं, विचारलेला प्रश्न समजावून घेऊन उत्तर देणं, तार्किक विचार करणं इ. खेळातून व गटकार्यातून विकसित होत असतात. मुलांना मिळालेलं स्वातंत्र्य, स्वावलंबनाचा व स्वयंशिस्तीचा आग्रह, स्वयंनिर्णयाची संधी व तणावरहित वातावरण यांच्यामुळे मुलांचा हा विकास सहजतेनं होतो. पुढील शिक्षणाचा हा पाया असल्यानं खऱ्या अर्थानं मुलांची औपचारिक शिक्षणासाठी तयारी होते.

कला हा तर शिक्षणाचा पायाच

देवीप्रसाद यांच्या Art the Basis of Education या उक्तीवर क.निं.बा.चा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे अगदी बालवाडीपासून इथं कलेला महत्त्व दिलं गेलं आहे. शाळेतील चित्रकला व हस्तकलेसोबत परिसरातील

पारंपरिक धनगरी गझी नृत्य अथवा मातीचे बैल किंवा मडकी बनवण्याचा यासारख्या पारंपरिक कुंभार-व्यवसाय यांचाही अभ्यास मुलं करतात. हा दृष्टिकोन मिळाला बंगळुरूच्या India Foundation for Arts या संस्थेकडून. या संस्थेनं क.निं.बा. व पुण्याच्या रेवाचंद भोजवानी अकॅडमी या शाळांचा एक संयुक्त प्रकल्प सुमारे तीन वर्षं राबवला होता. त्यातून कलेकडे शिक्षणाचा व एकूण जगण्याचा अविभाज्य भाग म्हणून बघायला क.निं.बा. शिकली. आपल्या आसपास आढळणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित वस्तूंकडं बघण्याचा, त्याचा सुयोग्य वापर करण्याचा दृष्टिकोन IFA नं दिला.

आणि इतर अनेक उपक्रम...

इयत्ता पाचवीपासून मुलं संगणक हाताळतात. पहिल्या दोन महिन्यात टायपिंगवर हात बसला की मुलांना प्रोग्रॅमिंगसारखं सॉफ्टवेअर शिकवलं जातं. मुलं आपल्या कथांवर चित्रं काढतात, त्यांना वेगवेगळे इफेक्ट्स

रंगात दंग...

देऊन स्लाईड शोज तयार करतात. शिक्षकही यू-टूबसारखी नव्या काळातली साधनं वापरून आपल्या अध्यापनाला पुष्टी देतात.

परिसरात निसर्गवाचनासाठी भ्रमंती करणं, वृक्षगणना, परसबागेची जोपासना, औषधी वनस्पतींची लागवड, फटाकेमुक्त दिवाळी, कागदाचा पुनर्वापर यासारखे अनेक उपक्रम शाळेत सातत्यानं चालू असतात.

बालसंसद

दर वर्षाच्या सुरुवातीलाच बालसंसदेची निवडणूक होते. लोकशाही पद्धतीनं गुप्त मतदान करून नवं मंत्रिमंडळ निवडलं जातं. दररोजच्या स्वच्छतेवर लक्ष ठेवणं, बालक्रीडोत्सव आयोजित करणं, शाळेतील विविध कार्यक्रमांचं शिक्षकांच्या मदतीनं नियोजन आणि संकलन, मुलांच्या लहानसहान समस्या सोडवणं यासारखी कामं मंत्रिमंडळ पार पाडतं.

शिकण्याचं महत्त्वपूर्ण माध्यम – प्रकल्प

वार्षिक प्रकल्प हे क.निं.बा.चे वैशिष्ट्य आहे. एक-दोन वर्ग किंवा कधीकधी संपूर्ण शाळा मिळून देखील एक विषय घेऊन आपापल्या टप्प्यांवर त्या विषयाचा विविध अंगांनी अभ्यास करते. मिळालेली माहिती, त्यातून काढलेले निष्कर्ष, त्यातून तयार झालेली नवी समज असं सगळं चित्रं, कविता, आलेख, प्रतिकृती यांच्या माध्यमातून मांडलं जातं. हे प्रदर्शन चांगलं मोठं असतं, आणि ते पाहण्यास सर्व फलटणकरांना निमंत्रण असतं.

प्रकल्पाचे विषय मुलांच्या रोजच्या आयुष्याला, परिसराला स्पर्श करणारे असतात. त्यामुळं मुलांना ते मांडता येतात. एखाद्या विषयाची सखोल माहिती मिळवण्याची व त्यातून शिकण्याची प्रक्रिया मुलांच्या ओळखीची होते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वासही वाढतो.

फलटणचा भूगोल, इतिहास, पन्नास वर्षांपूर्वीचं फलटणचं पर्यावरण यासारख्या मुलांच्या परिसराशी संबंधित विषयांबरोबरच महापूर, वीज, बालक-हक्क, हिंसा यासारखे विषयही या माध्यमातून मुलांनी हाताळलेले आहेत.

बालवाडीच्या भातुकलीच्या कोपऱ्यामध्ये मुलगेसुद्धा साडी नेसून घर-घर खेळतात, स्वयंपाक करतात, भांडी धुतात, अगदी मेकपही करतात. प्रस्थापित स्त्री-पुरुष 'स्टिरीओ टायपिंग'ला क.निं.बा. थारा देत नाही. बालवाडीत नाही आणि पुढंही नाही. वैचारिक बैठक पक्की असल्यानं या बाबतीत संस्थाचालकांना तात्त्विक संघर्ष करावा लागत नाही.

फलटणच्या दुष्काळी प्रदेशाची भौगोलिक पार्श्वभूमी, ७०० वर्षांपासून इतिहासाची आणि महानुभाव पंथाची धार्मिक पार्श्वभूमी, बिरोबा-धनगरांची सांस्कृतिक पार्श्वभूमी या विस्तीर्ण आणि समृद्ध वातावरणात कमला निंबकर बालभवन सेंद्रीय पद्धतीनं रुजली. येथे येणाऱ्या मुलांबरोबर वाढली आणि बहरली. चिंतनशील नेतृत्व आणि शिक्षकांनी तिला उपक्रम, कृती आणि प्रकल्पांचं खतपाणी घातलं.

आज पंचवीस वर्षं झाली ! कमला निंबकर बालभवनला अनेक लोक भेटी देतात. कौतुकानं बघतात, भारावून जातात. कमला निंबकर बालभवन समाजाला काय देऊ शकतं? उपक्रम व प्रकल्प विषयांची यादी नव्हे तर विचार आणि परिस्थितीचं भान ठेवून शाळारूपी रोपट्याची निगा कशी राखायची याचा मंत्र ! त्यातून प्रकल्प विषय आणि शैक्षणिक उपक्रम निरंतर बाहेर पडत राहतील !

manjunimbkar@gmail.com
मंजिरी निमकर, माजी मुख्याध्यापिका क.निं.बा.
संचालिका व सचिव, प्रगत शिक्षण संस्था, फलटण.

कमलाबाई निंबकरांविषयी

नादिया कुरेशी

कमला निंबकर बालभवनच्या सर्व आठवणींमध्ये कायमच असणारी एक व्यक्ती म्हणजे ज्यांच्या नावावरून ही शाळा ओळखली जाते त्या कमलाबाई विष्णू निंबकर. कमलाबाई म्हणजेच पूर्वाश्रमीच्या एलिझाबेथ लंडी ! एलिझाबेथ यांचं बरंचसं बालपण पेनसिल्वेनियातील न्यू टाऊन या गावी गेलं.

एखादी लहानशी नोकरी करत आरामात जीवन जगावं, अशी एलिझाबेथ यांची त्यावेळी कल्पना होती. त्यासाठी डेक्स्ट्रेल इन्स्टिट्यूटमधून सेक्रेटरीच्या कामासाठीचा अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला आणि नोकरीही मिळवली. आर्थिक मंदीमुळे ही नोकरी फार काळ टिकली नाही. परंतु लवकरच एका औद्योगिक संशोधन संस्थेतील कामगारांच्या हजेरी, गळती इत्यादींबाबत संशोधन करण्याची संधी चालून आली. विविध उद्योजकांसमोर हे काम सादर करण्यासाठी 'वॉशिंग्टन युनायटेड स्टेट्स कोल कमिशन'कडून एलिझाबेथना बोलावणं आलं. या कामाला दाद मिळाली. वॉशिंग्टनमध्ये अशाच प्रकारचा मोठा अभ्यास करण्याची संधी एलिझाबेथना मिळाली. कामासाठी त्यांच्या हाताखाली पंधरा लोकही देण्यात आले. पण कमिशनपुढे नवाच पेच निर्माण झाला की एलिझाबेथपेक्षा जास्त शिकलेल्या लोकांना त्यांच्या हाताखाली काम देऊन कमी पगार कसा काय द्यायचा? एलिझाबेथनी स्वतःच ती नोकरी सोडून दिली पेच सोडवला, आणि आधी शिक्षण पूर्ण करायचं ठरवलं.

बी. ए. झाल्यानंतर नोकरीनिमित्त एलिझाबेथ न्यूयॉर्कमध्ये आल्या. आरोग्यसेवा देणाऱ्या विविध संस्थांची माहिती गोळा करण्याचं आणि ती

लोकांना पुरवायचं काम त्यांच्याकडे होतं. या नोकरीदरम्यान त्यांचा इंटरनॅशनल हाऊसशी संबंध आला. इथे अनेक परदेशी लोक येऊन राहात असत. त्यात काही भारतीयही होते. पुढे या भारतीयांनी 'हिंदुस्थान असोसिएशन' ही संस्था चालवण्यास सुरुवात केली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याला देशाबाहेरच्या लोकांकडून पाठिंबा मिळवणाऱ्या या संस्थेचं सर्व काम श्री. विष्णुपंत निंबकर पाहत असत.

विष्णुपंतांशी ओळख झाल्यावर आणि पुढे दोघांनी लग्नाचाही विचार केल्यावर एलिझाबेथनी लग्नाआधी भारताला भेट देऊन आपण तिथं राहू शकू का याचा अंदाज घ्यायचं ठरवलं. त्यानुसार १९३० मध्ये त्या भारतात आल्या. सुरुवातीचे काही दिवस त्या गांधीजींच्या साबरमती आश्रमात राहिल्या. तिथं गांधीजींशी ओळखही झाली आणि अनेकदा विविध विषयांवर चर्चाही झाल्या. पुढं बरंचसं भारतभ्रमण आणि लोकांच्या भेटीगाठी झाल्यानंतर निंबकरांशी लग्न करून भारतात स्थायिक होण्याचा निर्णय एलिझाबेथनी घेतला. लग्नानंतर भारतीयत्व स्वीकारतानाच एलिझाबेथनी आपलं नाव बदलून 'कमला' असं केलं.

लग्नानंतरची काही वर्षं कमलाबाई जोधपूर येथे राहिल्या. याच काळात त्यांना एक मुलगाही झाला. नंतर कमलाबाई मुंबईला आल्या. आपल्या मुलासाठी सनीसाठी (बनविहारी) इथं उत्तम शिक्षण देणारी एकही बालवाडी नाही, हे त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी स्वतःच बालवाडीचं प्रशिक्षण घेण्याचं ठरवलं. त्यासाठी, फ्रोबेल पद्धतीच्या बालवाडीचं प्रशिक्षण घेण्यासाठी १९३४ साली त्या मुलाला घेऊन इंग्लंडमधील वेस्टहिल येथे रवाना झाल्या. पुढे एक वर्षभर आई व मुलगा एकाच बालवाडीत शिकले.

१९३५ मध्ये फ्रोबेल टीचिंग सर्टिफिकेट मिळवून कमलाबाई मुंबईला परतल्या. खारमध्येच त्यांनी 'न्यू खार स्कूल' ही फ्रोबेल पद्धतीचा अवलंब करणारी भारतातील पहिली बालवाडी सुरू केली. पुढे पालकांच्या आग्रहामुळे १९४२ मध्ये बालवाडीचं रूपांतर पूर्णवेळ शाळेत झालं.

खारमधील 'अखिल भारतीय महिला परिषदे'च्या कामातही कमलाबाईंनी भाग घेतला. १९४२ साली विजापूर येथे दुष्काळग्रस्तांसाठी

चाललेल्या परिषदेच्या कामाला कमलाबाईंनी मनापासून हातभार लावला. दुष्काळग्रस्त भागात अन्नछत्र चालवतानाच तिथल्या लोकांसाठी त्या कपडेही शिवून देत. त्या वेळच्या अनुभवाविषयी कमलाबाई सांगतात की भारतात एक गोष्ट मला नव्यानंच शिकायला मिळाली की इथे गरजूंना कपडे नुसते देऊन भागत नाही, ते त्यांच्या अंगावर घालावे लागतात, कारण त्यांना कपड्यांची कितीही गरज असली तरी ते कपडे विकून पैसा बनवण्याकडेच त्यांचा कल असतो.

अन्नछत्राचं काम पाहतानाच अनेक लमाणी बायकांशी कमलाबाईंची ओळख झाली. लमाण बायकांच्या हातातली शिवण व विणकामाची कला त्यांनी पाहिली. आणि लमाणी बायकांचा एक गट तयार करून त्यांच्याकडून विविध वस्तू बनवून घेऊन, त्यांच्या विक्रीचं काम सुरू केलं. त्यातून अनेक दुष्काळग्रस्त लमाणी कुटुंबांना मदत मिळत गेली.

१९४२ मध्येच कमलाबाईंनी 'बॉम्बे सबर्बन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली आणि तोपर्यंत मोठी झालेली 'न्यू खार स्कूल' सोसायटीच्या ताब्यात देऊन टाकली.

१९४५ मध्ये त्यांच्या आईचं निधन झालं. वडील एकटे पडले. त्यांच्यासोबत काही काळ घालवायला त्या फिलाडेल्फियाला गेल्या. तिथे असताना त्यांनी व्यवसायोपचार (Occupational Therapy) प्रशिक्षणाचा एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

भारतात परतल्यानंतर व्यवसायोपचाराचं प्रशिक्षण देणारी एखादी संस्था इथं सुरू करावी, असा विचार त्यांनी केला आणि तो प्रत्यक्षातही आणला. त्यासाठी काही वर्षं अथक परिश्रम केले. इमारत बांधण्यापासून, साहित्य जमवण्यापासून ते विद्यार्थी मिळवण्यापर्यंत सर्व कामांत विष्णू निंबकरांनीही कमलाबाईंना मोलाची साथ दिली.

पुढील नऊ वर्षं कमलाबाईंनी के. इ. एम. मधील प्रशिक्षणवर्गांच्या मानद संचालकपदाची सूत्रं सांभाळली. त्यानंतर त्या तिथून बाजूला झाल्या. त्यानंतर संस्थेचा दर्जा खालावला, इतकंच नाही तर स्वत: कमलाबाईंनाही मानहानी सोसावी लागली. इथलं काम संपुष्टात येणार याची चाहूल कमलाबाईंना लागली होती. तेव्हा १९५८ मध्ये वयाच्या ५८व्या वर्षी पुन्हा नव्यानं दुसरं व्यवसायोपचार प्रशिक्षण कॉलेज सुरू

विष्णुपंत निंबकरांसोबत

करण्याचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचं सहकार्य कमलाबाईंना लाभलं आणि जुलै १९५८ मध्ये नागपूरमध्ये आशियातील दुसरं 'व्यवसायोपचार प्रशिक्षण महाविद्यालय' सुरू झालं.

हे काम भारतातील प्रभावशाली लोकांपर्यंत पोहोचवण्याचाही कमलाबाईंनी नेहमीच प्रयत्न केला. कांतीलाल शहा, सर्वपल्ली राधाकृष्णन, सर रामस्वामी मुदलियार, मोरारजी देसाई अशांना प्रशिक्षण केंद्राचं काम पाहायला त्या बोलवत असत.

श्रीलंका, मलेशिया, स्पेन, इंडोनेशिया या देशांमध्येही कमलाबाई व त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यवसायोपचाराचा प्रसार केला व अनेक रुग्णालयांमध्ये व्यवसायोपचार केंद्रं उभी करून द्यायलाही मदत केली.

व्यवसायोपचारासंबंधीच्या कामामध्ये कमलाबाईंचा कल हा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याकडे होता. अनेक वेगवेगळ्या रोगांतून

व्यवसायोपचार – हा तर आत्मसन्मानच !

उठलेल्या, अपघातांतून बचावलेल्या लोकांसाठी शक्य तितके वेगवेगळे उपाय शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कुष्ठरोग्यांपासून ते भाजलेल्या रुग्णांपर्यंत प्रत्येकाची स्वतंत्र गरज ओळखून त्यांनी अनेक उपकरणं व यंत्रं बनवली.

रुग्णांना वस्तू बनवायला देणं इथपर्यंतच कमलाबाईंचं काम मर्यादित नव्हतं. तयार झालेल्या वस्तूंचं प्रदर्शन व विक्रीही त्या-त्या रुग्णालयांमध्ये होत असे. हा अतिशय महत्त्वाचा भाग होता. त्यामुळे आपल्या उपचारांचा खर्च ते रुग्ण स्वत:, स्वत:च्या कमाईनं रुग्णावस्थेत असतानाच पूर्ण करू शकत असत. रुग्णांच्या आत्मसन्मानासाठी हे आत्यंतिक महत्त्वाचं होतं. वेताच्या टोपल्या, चटया, लोकरीचे कपडे, लाकडावरील कलाकुसर अशा कितीतरी वैविध्यपूर्ण वस्तू त्यामध्ये होत्या.

१९५९ मध्ये कमलाबाईंनी 'जर्नल ऑफ रिहॅबिलिटेशन इन एशिया' या नियतकालिकाची सुरुवात केली. पुढे १९६५ साली 'निंबकर रिहॅबिलिटेशन ट्रस्ट'ची स्थापना केली. या त्यांच्या महत्त्वपूर्ण कामाची नोंद जागतिक पातळीवर घेतली गेली. रिहॅबिलिटेशनच्या क्षेत्रातील सर्वोच्च मानला जाणारा 'अल्बर्ट ॲन्ड मेरी लास्कर' पुरस्कार कमलाबाईंना १९७२ साली प्रदान करण्यात आला.

वयाच्या पंच्याहत्तरीत त्यांनी या कामांमधून अंग काढून घेतलं. पण त्या स्वस्थ बसणाऱ्यातल्या नव्हत्याच, भारतातील व्यवसायोपचाराचा इतिहास सांगणारं - New Life for the handicapped: - History of Rehabilitation and Occupational Therapy in India हे पुस्तक त्यांनी लिहीलं. काम नुसतं करून भागत नाही, त्याची नोंदही ठेवावी लागते, हे त्यांना माहीत होतं. वयाचं बंधन कोठेही आड येऊ न देता जन्मभर नवनवीन गोष्टी सतत शिकत राहणाऱ्या कमलाबाईंचं नाव लावणारी फलटणची कमला निंबकर बालभवन ही शाळाही हाच आदर्श मानते.

qrenadia@gmail.com

नादिया कुरेशी, कमलाबाई निंबकराची पणती.
माजी विद्यार्थिनी क.निं.बा.,
पुरातत्त्वशास्त्र आणि पर्यावरणीय मानववंशशास्त्र
या विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षण.

निळ्याशार आकाशाखाली लालबुंद ट्रक!

वसीम मणेर



सामान भरून झाल्यावर अम्मी मला घेऊन ट्रकच्या केबिनमध्ये बसली. अल्ताफभाई ड्रायविंग सीटवर बसला आणि त्याने स्टार्टर मारला. केबिनमध्ये वरच्या बाजूला लावलेल्या विशाळगड दर्ग्याच्या तस्विरीला हात लावून स्वतःच्या छाती ओठ कपाळ आणि पुन्हा छातीला स्पर्श करत नमस्कार केला. आमचा ट्रक पुसेगावकडून कोरेगावकडे निघाला. नुकत्याच सुरू झालेल्या वसंताचं निळंभोर आकाश, लख्ख ऊन आणि विस्तीर्ण पसरलेली शेतं आणि माळरान. हा लालबुंद ट्रक असा एकटाच लख्ख निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ उन्हातून जाताना किती सुंदर दिसत असेल असं मला त्यावेळी वाटलं.

माझं वय होतं सहा-सात वर्षाचं. माझ्या मनात बालपणीची काही सुंदर चित्रं कायमची आहेत, त्यापैकी हे एक आणि हे जिवंत राहिलं याला कारण माझी शाळा. कमला निंबकर बालभवनला मी इयत्ता दुसरीला आलो. दुसरी गाठेपर्यंत मी ही सहावी शाळा गाठली होती. कुटुंबकलह आणि बदलत्या गावांमुळे दर काही महिन्यांनी बदलणाऱ्या शाळेमुळे आपण कधी नीट शिकू की नाही ही भीती कायम असे. कसलीही शाळा असली तरी मी जायला तयार असे. 'तुम्ही द्याल ते आणि तुम्ही म्हणाल तसं शिक्षण' घेण्याची तयारी असे. ही परिस्थिती असताना मी अशा एका शाळेत आलो जिथं मला विचारलं गेलं, सांगितलं गेलं- शिक्षण मला वाट्टेल ते, मला वाट्टेल तसं ! इयत्ता दुसरीतल्या त्या पहिल्या विस्मयकारी दिवसापासून ते आजपर्यंतच्या प्रवासाकडे वळून बघताना गहिवरून आल्याशिवाय राहत नाही.

या शाळेनं मला जे काही दिलं त्यातलं माझ्यासाठी सर्वात उजवं आणि महत्वाचं ठरलं ते सर्जनात्मक लेखन. त्यास असणारं प्रोत्साहन आणि पोषक वातावरण.

सर्वसाधारणपणे कोणत्याही शाळेचा निबंध लिहिणं हा नियमित उपक्रम असतो. आपल्या वरच्या वर्गातल्या श्रेष्ठ निबंधकारांचे निबंध वाचले जातात, काचफलकात लावले जातात आणि प्रशंसा केली जाते. साहजिकच मुलं मग प्रशंसा होईल अशा साच्यात निबंध लिहितात आणि बघता बघता प्रत्येक निबंध - मग तो कोणत्याही का विद्यार्थ्यानं लिहिलेला असेना - एकाच साच्यातून आल्यासारखा वाटतो.

या शाळेत येण्यापूर्वी मी थोरामोठ्यांच्या जयंत्यांवर निबंध वाचनाचे कार्यक्रम खाली बसून ऐकले होते. त्यावेळी निबंध लेखन म्हटलं की माझ्या हृदयात धडकीच भरायची. कारण प्रत्येक निबंध कुठल्यातरी सुविचारानं किंवा उक्तीनं अथवा संस्कृत श्लोकानं सुरू व्हायचा. घरी खायची बोंब असताना, आता आपण निबंध लिहायचा म्हणजे हे उक्ती, श्लोक आणायचे कुठून हा प्रश्न पडायचा. माझ्या शेजारी राहणाऱ्या एका सुखवस्तू, खाजगी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्याकडे उत्कृष्ट निबंध नावाचं पुस्तक होतं. त्यातून निबंध उतरवून काढून तो बरीच बक्षिसं जिंकायचा. मला मोठं झाल्यावर ते पुस्तक घ्यावं असं फार वाटायचं. पुस्तक

असलं की सालं कामच झालं !

कमला निंबकर बालभवनमध्ये आल्यावर शाळेच्या बैठकव्यवस्थेपासून सर्वच बाबतीत ही शाळा वेगळी आहे, असं जाणवलं ! एक दिवस आमच्या बाई म्हणाल्या ''निबंध लिहा''. मी म्हटलं ''बोंबला !'' कारण तोवर आम्ही खोली बदलली होती. त्या मुलाकडून उसनं-पासनं 'उत्कृष्ट निबंध' पुस्तक मिळण्याची कसलीच शक्यता नव्हती. वर बाई म्हणाल्या, ''आत्ता इथे लिहा.'' काय लिहायचं? ''अविस्मरणीय प्रसंगाबाबतीत लिहा. खरं लिहा. तुमच्या बरोबर जे घडले असेल ते. तुम्ही घाबरला असाल किंवा तुम्हाला मजा आली असेल किंवा...'' बाई समजावत होत्या आणि त्यातून लक्षात येत होतं की आपल्याला जे वाटतंय ते, आपल्याला हवं ते लिहायचं आहे आणि What a relief या इंग्रजी वाक्प्रचाराचा पुरेपूर प्रत्यय आला. लेखन पुरेपूर झाल्यानंतर बाईंनी निबंध पहिले. हा वर्ग होता चौथीचा. याही वर्गात उत्कृष्ट निबंध प्रकारात मोडणारे निबंध होतेच. पण या वर्गात एक नवल घडलं. उत्कृष्ट निबंध या प्रकारात न मोडणाऱ्या काही निबंधांचं बाईंनी वाचन केलं आणि वाहवा केली. त्या दिवसापासून लेखन हे माझ्या जगण्याचा अविभाज्य भाग बनलं ते आजपर्यंत. अगदी व्यावसायिक पातळीपर्यंत.

कमला निंबकर बालभवन शाळेची अनेक बलस्थानं आहेत. त्यातील मुलांच्या सृजनात्मक लेखनाला दिलेलं प्रोत्साहन आणि त्यास आवश्यक असलेलं आणि मिळणारं पोषक वातावरण हे होय. याचा परिणाम म्हणजे नवनीत या वार्षिक पत्रिकेतून बाहेर पडणारं अत्यंत सकस बालसाहित्य.

पटकथा लेखक, चलचित्र छायाकार आणि दिग्दर्शक म्हणून काम करताना मला वेळोवेळी जाणवत राहतं की आपण आज जे काही सर्जनात्मक काम करतोय त्याचा भक्कम पाया शाळेने घातला. चांगलं लेखन म्हणजे काय, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे, असं मला वाटतं आणि शालेय पातळीवर शिक्षकांना याविषयीची समज असणं फार महत्त्वाचं आहे! मुलं जे काही लिहित असतात ते त्यांच्या अनुभवविश्वाचं झिरपण असतं. पोषक वातावरणात ते अत्यंत निरागसपणं बाहेर पडतं.

कमला निंबकर बालभवनमध्ये काय केलं जातं तर भाषिक विविधता प्रशंसली जाते. सर्व निबंध पहिले वाचले जातात. लिहिण्यासाठी वेळ दिला जातो. शाळेत लेखनासाठी वेळ राखून ठेवला जातो. दरवर्षी नियमित नवनीत पत्रिका निघत असल्यानं मुलांना हक्काचं व्यासपीठ मिळतं.

मुलांच्या लेखन कौशल्याच्या वृद्धीबाबत शिक्षकांची भूमिका निर्णायक ठरते. मुले लिहिती होण्यासाठी कनिबामध्ये शिक्षक जादाची मेहनत घेतात. मुलांना विविध अनुभव दिले जातात. वेगवेगळ्या गोष्टी दाखवल्या जातात. विविध विषयांवर चर्चा, व्याखानं, स्लाईड-शो होतात. आणि मग त्या अनुषंगानं लिहिण्यास सांगितलं जातं. माझा आवडता पक्षी, मी मोठा झाल्यावर कोण होणार? माझा आदर्श, माझा अविस्मरणीय प्रसंग अशा पठडीतल्या विषयांबरोबरच इतरही नावीन्यपूर्ण विषय लेखनासाठी सुचविले जातात.

लिहायचं म्हणजे नक्की काय हे मुलांना आणि शिक्षकांना समजणं फार महत्त्वाचे आहे. अनुभव कथनाकडून प्रवासवर्णन, चिकित्सा, परीक्षण, वैचारिक, स्वप्नविलास, दीर्घकथा अशा अनेक लेखनप्रकारात मुलं सहज घुसतात. लेखन म्हणजे नुसता छंद नसून आपल्या विचारांना वाट देण्याच्या माध्यमाबरोबरच हे प्रकरण व्यावसायिक पातळीपर्यंत नेता येऊ शकतं असं मुलांना शाळेच्या पातळीवर हळू हळू उमगतं. मलाही उमगलं.

तळागाळातून आलेली मुलं आयुष्य केवढं पाहत असतात. दिवसागणिक जगण्याच्या प्रक्रियेला सामोरं जात असतात. जे पहावं ते आणि जे पाहू नये ते सर्व गोष्टी पाहतात. लेखनाच्या सवयीमुळे जीवनाचा केवढा अनुभव कलमबंद होतो. एका बिंदूनंतर मुलांना सुचवलेल्या विषयांची गरज उरत नाही आणि स्वयंप्रेरणेनं ती लिहिती होतात. हेच खरं शिक्षकांचं यश असतं.

माझ्या घराच्या मागं छोटीशी जागा आहे. संध्याकाळच्या मंद गार वाऱ्यात चहाचा कप घेऊन पायरीवर बसताना मी नेहमी ठरवतो की या जागेत बाग फुलवायची. पण बांधकामामुळे त्या जागेत सिमेंट, गज, विटा, कॉन्क्रीटचे, प्लास्टरचे तुकडे बघून 'इथे काय उगवणार? आणि उगवायचं म्हटलं तरी किती मेहनत आणि मशागत करावी लागणार' असं वाटायचं. घराच्या वॉश बेसिनचं पाणी तिथंच सोडलेलं आहे. त्या ओलाव्यात एके दिवशी एक वेल उगवला. मला वाटलं, असेल काही. बघता बघता मोठा झाला. फुलं-फळं लागली, मोठी झाली आणि मी उडालोच. त्या सिमेंट वाळूच्या, प्लास्टरच्या चुऱ्यात त्या इवल्याशा वेलाला चार टमटमीत खरबुजं लागली होती. खरबुजासारखं महाग आणि नाजूक पीक असं इथं उगवलं होतं. वन स्ट्रॉ रेवोलुशनमध्ये मासानोबू फुकुओका यांनी म्हटलंच आहे, 'शेतीत खूप मशागत करण्याची गरज नसते. निसर्गाला थोडंसं पोषक वातावरण दिलं तर आपले डोळे विस्फारतील इतक्या वेगानं निसर्ग वाढ घेतो.' प्रतिभेचंही तसंच असावं, असं मला वाटतं. नवनीतमध्ये दरवर्षी छापल्या जाणाऱ्या टमटमीत खरबुजांची हीच तर खरी गोष्ट आहे !

mwaseem1@gmail.com

वसीम मणेर, क.निं.बा.चे माजी विद्यार्थी.
'होऊ दे जरासा उशीर' चे दिग्दर्शक व पटकथालेखक.

मुलांनी तयार केलेलं रिलीफ प्रिंट

आमचा आनंददायी प्रवास

प्रकाश अनभुले

कमला निंबकर बालभवनला आणि माझ्या शाळेबरोबरच्या प्रवासालाही पंचवीस वर्ष पूर्ण झाली आहेत. या प्रवासात माझ्या दोन भूमिका आहेत. एक विद्यार्थी म्हणून व दुसरी शिक्षक म्हणून. शिक्षक म्हणून ज्या विविधांगी भूमिका मला दिल्या गेल्या त्यातूनच मी घडत गेलो.

माझं कुटुंब गरीब, मोलमजुरी करून पोट भरणारं होतं. शिकत न बसता काम करून चार पैसे कमवावे, अशी वडिलांची इच्छा होती. पण आपल्या मुलानं शिकावं अशी आईच्या मनात धगधगणारी ठिणगी होती. शरीरानं अशक्त आणि अभ्यासात अप्रगत अशा मुलाला मतिमंद मुलांच्या शाळेत टाकावं का हे विचारण्यासाठी आईनं मला डॉ. मंजिरी निमकरांकडे नेलं. त्यांच्यातील डॉक्टरनं हा मुलगा मतिमंद नाही हे ओळखलं आणि त्यांच्यातील शिक्षणतज्ज्ञानं हा शिकू शकेल हे ताडलं. आणि कमला निंबकर बालभवनचा पहिला विद्यार्थी म्हणून माझा प्रवास सुरू झाला.

शाळा म्हणजे गाणी, गोष्टी आणि दंगामस्ती. त्यामुळे शाळेत मन लवकरच रमलं. ही सुरुवात संस्मरणीय बनली ती स्मिताताई देशपांडेंमुळे. त्या माझ्या पहिल्या शिक्षिका. बालवाडी म्हणजे आमचं दुसरं घरच बनून गेलं होतं.

आशाताई रुद्रभटे यांचा आम्हा मुलांची सर्जनशीलता पारखण्यात खूप मोठा वाटा आहे. कविता कशाला म्हणतात हे देखील माहीत नव्हतं, पण आम्ही ती करत होतो. कविता आणि लेखनामुळे एक वेगळी निरीक्षणशक्ती आणि वैचारिक बैठक मिळाली. आम्ही वेगवेगळ्या सामाजिक वर्गातील, वेगवेगळ्या वातावरणात वावरणारे विद्यार्थी होतो. त्यामुळे प्रत्येकाची भाषा वेगवेगळी होती. शाळेत कोणतीही प्रमाणभाषा नव्हती. आमच्या स्वयंस्फूर्त लेखनाची भाषा शाळेत स्वीकारली आणि कौतुकलीही जात होती. (त्यामुळे अगदी ग्रामीण भाषेतील माझी 'बा म्हणतु...' ही कविता मला निर्भीडपणे मांडता आली.)

नवनवे प्रयोग आणि प्रकल्प यांतून आम्ही शिक्षण कसं जगलं जातं हे शिकत होतो. अनुभवत होतो. प्रकल्प आवडायचे, कारण भटकंती करायला मिळायची. प्रकल्पातून आत्मसात केलेल्या स्वयंअध्ययन, विषयाची मांडणी या गोष्टी पुढे पावलोपावली उपयोगी पडत गेल्या. पुस्तक हे फक्त माध्यम म्हणून वापरलं पाहिजे, शालेय अभ्यासक्रमाचं बोट धरून विविध उपक्रमांद्वारे सर्वांगीण विकास करता येतो आणि भविष्यात होणाऱ्या बदलांना सामोरं जाण्यासाठी हे गरजेचं आहे, हा विचार शाळेनंच दिला.

१९९४ हे वर्ष माझ्यासाठी महत्त्वाचं ठरलं. शाळेमध्ये संगणक आले आणि आम्ही संगणक शिकू लागलो. त्यावेळी एका संगणकाची किंमत लाखाच्या घरात होती आणि संपूर्ण जिल्ह्यात मुलांसाठी ही सुविधा कुठेही नव्हती. आम्ही मात्र केव्हाही शाळेत जाऊन संगणक वापरू शकत होतो. संगणक शिक्षणाबरोबरच दहावीच्या परीक्षेची तयारीही चालू होती. दहावीच्या आमच्या पहिल्या बॅचनं शंभर टक्के निकाल लावून या भागात एक इतिहास घडवला.

पुढील शिक्षणासाठी बाहेर जाणं गरजेचं होतं. शाळा पूर्णपणे सोडणं तर शक्य वाटत नव्हतं. काहीतरी आर्थिक स्रोत उभा करणं हेही माझ्यासाठी गरजेचं होतं. अशात एक चांगली संधी मिळाली, संगणक – शिक्षक म्हणून रोज तीन तास काम करण्याची.

या शालेय प्रवासात आणखी एक गुरू मिळाला, मॅक्सीन बर्नसन. त्यांच्या सहवासानं जे दिलं, शिकवलं ते अनमोल आहे. दहावीनंतर संगणक क्षेत्रच निवडावं असा माझा निर्णय झाला, पण तो अपयशी ठरला. तेव्हा आयुष्य थोडं उदासीनतेकडे झुकलं. त्यावेळी 'शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया असते. एखाद्या अपयशानं ती थांबत नाही.' या मॅक्सीनआजींच्या बोलण्यानं थोडा आत्मविश्वास आला. मोठा आर्थिक खर्च उचलून शाळेनं मला संगणक प्रशिक्षण दिलं. शाळा खंबीरपणे पाठीशी उभी राहिली नसती तर कदाचित मी भरकटत गेलो असतो.

२००० सालापासून मी शाळेत संगणक शिक्षक म्हणून पूर्ण वेळ काम करू लागलो. नवनीतच्या संपादक मंडळात काम करणं, प्रोजेक्ट प्रपोजल्स कशी तयार होतात हे पाहणं, त्याचा अभ्यास करणं, नुसतं यांत्रिकपणे काम न करता समजून घेऊन, त्यावर विचार करून ते करणं अशी अनेकविध कामं चालू होती. एक शाळा चालवताना केवढ्या विचारांचा आणि कष्टांचा प्रपंच थाटावा लागतो, हे मला जवळून पाहायला मिळालं. माझ्यावर सोपवल्या जाणाऱ्या कामांमुळे माझी कौशल्यही पणाला लागत होती. संस्थेच्या दोन वेबसाईटस्, अनेक पुस्तकांच्या स्क्रिप्ट आणि लेआउटवर मी काम केलं.

विद्यार्थी असताना शाळेतून परत जाताना खूप काही घेऊन जात होतो. आज शिक्षकदशेत असलो तरी हेतू बदललेला नाही आणि तो तितकाच सफल होतो आहे.

पंचवीस वर्षांचा प्रवास केवढं काय देऊन गेला हे शब्दात मांडणं शक्य नाही. आज एखाद्या नव्या सर्जनशील शाळेची कल्पना रेखाटायला सांगितली तर ती काही अंशी तरी मी रेखाटू शकेन एवढा विश्वास वाटतो, हेच या पंचवीस वर्षांच्या प्रवासाचं फलित म्हणायला हवं.

anbhuleprakash@gmail.com
प्रकाश अनभुले, क.निं.बा.चे पहिले विद्यार्थी.
शाळेत संगणक शिक्षक म्हणून कार्यरत.

मुलांचे सृजनात्मक लिखाण

बाळ आणि आई

जोराचा वारा सुटला
झाडाचा परिवार डुलायला लागला
आपला वारा आपल्यालाच छान वाटतोय
एकदाचं नाचायला भेटतंय, झाड म्हणालं.
आई आज खुप मज्जा येतीये, बाळ म्हणालं,
आई आपण सगळ्यांना फळं देतो
पण ते आपल्याला पाणी काही देत नाहीत
फळं लागल्यावर मात्र
हवरटवानी फळं घेतात.
आई म्हणाली, जाऊ दे रे बेटा
आता बोलून तरी काय फायदा?

स्वालिहा शेख,
इ. ३ री.

मित्र

अविरत माझा मित्र
आम्ही काढतो छान चित्र
वर्गाबरोबर दूर फिरायला जातो
डब्यातला खाऊ वाटून खातो
हवी असते मधली सुट्टी
पण नको असते रविवारची सुट्टी
आम्हाला असली सुट्टी जरी
आठवण येते साऱ्यांची घरी
फोनवरून गप्पा मारतो
शाळेत भेटल्यावर खूप खेळतो.

अपेक्षा सिधये
इ. ४ थी

शकू आणि तिची माय

संजना रिटे, इ. १ली

चारोळ्या

कल्पना म्हणजे माळावरचं गवत नाही
केव्हाही डोक्यात यायला.
विचारांची सात वर्षे जावी लागतात
कल्पनेची एक कारवी फुलायला.

महेश सावंत
इ. ९ वी.

उन्हाळ्याचे दिवस होते. शाळेला सुट्टी होती. काय करायचे? करमत नव्हते. मग आम्ही, म्हणजे मी, रजत आणि रशीकने मासे पकडायला जायचे ठरवले. मासेमारीसाठी आम्ही सगळ्यांनी काठ्या शोधल्या. गळ आणि पाच रुपयाची दोऱ्याची गुंडी आणली. तीच सर्वांनी वापरली. काठीला शिसे लावले. सगळी तयारी झाल्यावर पिशवी घेऊन निघालो.

कॅनॉलच्या शेजारी जी चारी असते त्यातून दानवे मिळतात. ते गोळा केले. चिखलातून चालल्यामुळे आमचे हातपाय भरले होते. कॅनॉलवर आलो. गळाला दानवे लावले आणि गळ पाण्यात टाकून बसून राहिलो. सर्वजण आपापल्या गळाकडे पहात होते. आधी कोणाची काठी खाली जाते आणि कोण पहिला मासा काढते आहे, याकडे आमचे लक्ष होते. तास गेला पण मासा नुसता दानवा खाऊन जायचा. आम्ही कंटाळलो आणि ठरवले की कॅनॉलपलीकडे जी विहीर आहे, तिथे जाऊन मासे पकडू. त्यासाठी कॅनॉल पोहून पार करायला लागणार होता.

रशीकला पोहायला येत नव्हते. म्हणून आम्ही कपडे काढून त्याच्याकडे दिले आणि कॅनॉल पोहून विहिरीकडे गेलो. कडेवर बसून पाण्यात गळ टाकले. बसलो माश्यांची वाट बघत. तोवर रशीकही कॅनॉलच्या पुलावरून चालत कपडे घेऊन विहिरीकडे आला. हळूहळू पिशवीत मासे जमा होऊ लागले. भरपूर मासे सापडले पण आता अंधार पडू लागला होता. आता जाताना कॅनॉलमधले खेकडे पकडू असे ठरवून आम्ही निघालो.

जाता जाता टायरचे तुकडे गोळा केले. एक काडेपेटी विकत घेतली. तोवर चांगला अंधार पडला. आता टायर पेटवून त्याच्या उजेडात खेकडे पकडायचे होते. पण टायर काही पेटेना. सगळ्या काड्या संपत आल्या, शेवटी थोडी कागदे गोळा केली. ती पेटवली. मग टायरही लगेच पेटला. आम्ही खेकडे पकडायला सुरुवात केली. रशीकने पेटता टायर हातात धरला आणि रजतने पिशवी घेतली. मी भराभर खेकडे पकडायला सुरुवात केली. कारण अंधारात कॅनॉलच्या कडेला खेकडे येऊन बसतात. मी त्यांना पकडून पिशवीत टाकत होतो. पिशवीत टाकण्याआधी नांग्या तोडत होतो. आता पिशवी चांगली जड लागायला लागली.

मग आम्ही घराकडे निघालो. आज खूप मासे आणि खेकडे घावले म्हणून आनंदात होतो. खेकड्याची कढी आणि माश्याचे कालवण खायला मिळणार. भूक लागत होती. घरी पोहोचल्यावर एका परातीत पिशवी रिकामी केली. पाहतो तर काय खेकड्यांनी माश्यांना खाऊन टाकले होते. माशांचे नुसते काटे आणि खेकडे उरले होते.

ऋतिक माने,
इ. ७वी

मासेमारी

पालकनीती / १६ जून २०१३
Posted at Marketyard PSO, Pune 411 037.
on 16th of each month.

RNI No. MAH MAR 2001 / 4166
Registered No. PNCW/M-50/2012-2014

कमल्याचा तमाशा

उन्हाळ्याची सुट्टी होती. आमची जत्रा उदया होती. तमाशा आज संध्याकाळी होता. काय कळत नसायचं तरी आम्ही तमाशाला जायचो. मी आणि कमल्या तमाशाला गेलो. सरपंचाने नारळ फोडून तमाशा सुरू केला. गवळणी झाल्या, गाणी झाली आणि मुख्य तमाशा संपताच मुलं आपापल्या घरी जाऊ लागली. कमल्या म्हणाला मी पण घरी जातो. मी म्हणालो जा. मग मी वगनाट्य बघत बसलो. वगनाट्य संपल्यावर मी घरी गेलो. घरी गेलो तर कमलेश अजून घरी नाय आला. मी म्हणलं घरात झोपला असेल. आम्ही सर्व घर फिरलो पण कमल्या काय सापडेना. मग कमलेशची आईसुद्धा रडू लागली. कमलेशच्या वडिलांनी मला अशी एक सनसनीत चापट लावली की मला तिरीमिरी आल्यासारखं झालं. तसाच मी किविलवाना चेहरा करून परत कमल्याला हुडकायला गेलो. पण कमल्या काय सापडंना झाला, मग मी कंटाळून तितल्या एका वाळूच्या ढिगाऱ्यावर बसलो. फिरल्यामुळे मला तिथेच झोप लागली. सकाळी उठून पाहतो तर कमल्याच मला म्हणतोय आरं यड्या, इथं कुठं झोपलाय? घरी चल. खरं तर कमल्या त्याच ढिगाऱ्यावर झोपला होता. मग आम्ही दोघं घरी गेलो.
तवापासून कमल्याला घेऊन कुठल्या तमाशाला गेलो नाही.

रणजित गुंजवटे
इ. ९ वी

आई आणि पिल्लू

सूर्य हे डोंगराचं बाळ असतं
कारण ते डोंगराच्या पोटात लपतं
सूर्य दिवसभर डोंगराला हुडकतो हुडकतो
मग संध्याकाळी डोंगराच्या पोटात जाऊन लपतो
मग सगळीकडे अंधार होतो
मग आपण डोवतो आणि झोपतो.

श्रुती भोसले, मधला गट
आमची शाळा



किती तरी दिवसांत

किती तरी दिवसांत उंटावर नाही बसले,
कारण उंटच आला नाही
रस्त्यावरून जाताना होतो मला उंटाचा भास
उंटाच्या पाठीवर बसून कधी करू मी प्रवास?
सर्व प्राण्यांमध्ये उंट आहे माझा खास
एकदा तरी भेटेल मजला उंट
आहे मला पूर्ण विश्वास

ऋतुजा सावंत,
इ. ३ री.